## हिमाचलमधील संजौली मशीद पाडण्याचे आदेश

■ वृत्तसंस्था, शिमला, दि. ३ :
हिमाचल प्रदेशातील वादग्रस्त संजौली मशीद पाडण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्तांनी दिले आहेत. महापालिका आयुक्तांच्या आदेशानंतर आता मशिदीचे खालचे दोन मजलेही काढून टाकावे लागतील. गेल्या वर्षी ५ ऑक्टोबर रोजी महापालिका आयुक्तांनी वरचे तीन मजले पाडण्याचे आदेश दिले होते.

महानगरपालिका आयुक्त भूपेंद्र अत्री यांनी संपूर्ण मशीद बेकायदेशीर घोषित केली आहे आणि ती पाडण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान, वक्फ बोर्ड आणि मशीद समिती मालकीचे कागदपत्रे न्यायालयात सादर करू शकले नाहीत.


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक ३०७ * * अमरावती * रविवार, दिनांक ४ मे २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त



श्रीकृष्ण ज्वेलर्स



• आभुषणांची विशेष शृंखला ९१.६ के सुवर्ण ग्राहकांच्या विश्वासामुळे अल्पावधीतच प्रसिद्ध
• नेकलेस, बांगड्या, कंगन, बोरमाळ, मंगळसूत्र व महाराष्ट्रीयन दागिन्यांचे विक्रेते

कॉफी हाऊस बिल्डिंग, गोकूळपेठ, नागपूर 2557429, 2542486


## थोडक्यात

### सुहास शेट्टीच्या हत्येनंतर मंगळुरूत तणाव



■ मंगळुरू : बजरंग दलाचा नेता आणि २०२२ च्या फाजिल हत्याकांडातील प्रमुख आरोपी सुहास शेट्टी याची मंगळुरू येथे निर्घृण हत्या करण्यात आली. तेव्हापासून परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाने ६ मे पर्यंत संपूर्ण शहरात कर्फ्यू लागू केला आहे. पोलिसांनी आतापर्यंत ८ जणांना ताब्यात घेतले आहे. यामध्ये अब्दुल सफवान, नियाज, मोहम्मद मुझम्मिल, खलंदर शफी, आदिल मेहरुफ, नागराज, रंजीत आणि रिझवान यांचा समावेश आहे.

### लॉरेन्सच्या धमकीने पाकिस्तानी डॉन संतप्त

■ जालंधर : पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्याच्या गँगस्टर लॉरेन्सच्या धमकीमुळे पाकिस्तानी डॉन शहजाद भट्टी अस्वस्थ झाला. तो म्हणाले, पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या मुंबईत झालेल्या हत्येमागील गुपिते मी उघड करेन. आता मैत्री संपली आहे. जर हा विषय देशाचा असेल तर आम्ही गप्प बसणार नाही. पाकिस्तानी डॉन शहजाद भट्टीने याचा एक व्हिडिओ जारी केला आहे, ज्यामध्ये त्याने या सर्व गोष्टी सांगितल्या आहेत. लॉरेन्स टोळीकडून धमक्या मिळाल्यानंतर त्याने काही दिवसांपूर्वी हा व्हिडिओ प्रसिद्ध केला.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, लॉरेन्स ग्रुपने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली होती ज्यामध्ये पाकिस्तानी दहशतवादी हाफिज सईदच्या फोटोवर क्रॉस लावण्यात आला होता.

### वर्धेची मुस्लिम महिला राम मंदिरातून ताब्यात

■ अयोध्या : अयोध्येतील रामजन्मभूमी संकुलाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या एका मुस्लिम महिलेला सुरक्षा कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेतले आहे. पोलिस आणि एजन्सींनी महिलेचे नाव आणि पत्ता पडताळण्यास सुरुवात केली आहे.

ही महिला महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील रहिवासी आहे. तिचे नाव इरिम आहे. दुपारी ही महिला इतर भाविकांसह दर्शनासाठी रामजन्मभूमी संकुलात गेली होती.

ही महिला श्री राम जन्मभूमी संकुलाला भेट देण्यासाठी आली होती. ती इतर महिलांसोबत दर्शनानंतर परतत होती. ती मंदिराच्या बाहेर पडताच सुरक्षा कर्मचाऱ्यांनी तिचे हावभाव पाहून तिला थांबवले. त्या महिलेने डोक्यावर आणि चेहऱ्यावर निळा कापड बांधला होता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तिने तिथेच सुरक्षा कर्मचाऱ्यांना उद्धटपणे उत्तर देण्यास सुरुवात केली.

प्रकरण संशयास्पद पाहून सुरक्षा कर्मचाऱ्यांनी अधिकाऱ्यांना संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली. यानंतर, महिलेला पडताळणीसाठी रामजन्मभूमी पोलिस ठाण्यात पाठवण्यात आले. पोलिस स्टेशन आणि सुरक्षा एजन्सींनी महिलेची अनेक फेऱ्यांमध्ये चौकशी केली आहे. ती सतत फिरत असल्याचे कुटुंबियांनी सांगितले आहे.

## सामाजिक न्याय व आदिवासी विभागांचे ७४५ कोटी

# लाडक्या बहीणींसाठी वळते

### अर्थ खात्यावर शिंदेसेना नाराज : नवीन राजकीय वादाला तोंड फोडण्याची शक्यता

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :
विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणह्व या महत्वाकांक्षी योजनेसाठी आता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच आदिवासी विकास विभागाचा एकूण ७४५ कोटी ३० लाख रुपयांचा निधी वळवण्यात आला आहे.



याबाबतचा अधिकृत शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला असून, यावरून राजकीय वाद पेटण्याची शक्यता आहे.

या योजनेत सामाजिक न्याय विभागाचे ४१० कोटी ३० लाख आणि आदिवासी विकास विभागाचे ३३५ कोटी रुपये या योजनेसाठी वर्ग करण्यात आले आहेत. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा हेतू स्तुत्य असला, तरी तिजोरीवरील भार वाढल्याने इतर योजनांच्या निधीची कापणी होत असल्याचा आरोप विरोधकांकडून होऊ लागला आहे.

लाडकी बहीण योजनेच्या जाहिरातींसाठीही सरकारने जवळपास २०० कोटी रुपये खर्च केल्याचे समोर आले असून, अशा प्रचंड खर्चाच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्ष सरकारवर निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून राजकीय लाभ घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत आहेत.

सद्यस्थितीत हा निधी वळवण्याचा निर्णय तात्पुरता असला तरी त्याचे दूरगामी परिणाम सामाजिक योजनांवर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेषतः आदिवासी आणि मागासवर्गीय योजनांच्या अंमलबजावणीवर याचा परिणाम होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त केली जात असून, शिंदेसेना कमालीची नाराज आहे.

## अर्थवाले जास्त डोकं चालवत असतील तर...



अजित पवार आम्हाला निधी देत नाहीत, असा कांगावा करत शिवसेनेत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात मोठी बंडाळी झाली. पण नंतर अजित पवारही महायुतीत आल्याने त्यांच्यावर दादांच्याच नेतृत्वात काम करण्याची विचित्र वेळ आली. त्यानंतर आता शिवसेनेच्या मंत्र्यांनी पुन्हा अजित पवार आमच्या खात्याचा निधी पळवतात असा धोशा लावला आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, लाडकी बहीण योजनेसाठी माझ्या खात्याचा निधी वळवला आहे. मी अनेकदा सांगितले आहे की असे करता येत नाही पण तरीही निधी वळवण्यात आला आहे. जवळपास सव्वा चारशे कोटी रुपये वर्ग करण्यात आले असून याची मला काहीच कल्पना नाही, असे शिरसाठ म्हणाले.

सहन करायला काही मर्यादा असते, यापेक्षाही जास्त करत असाल तर सर्वच निधी एकदाच कट करुण घ्या. सामजिक न्याय खात्याचा निधी तुम्हाला कायदेशीर रित्या वर्ग करता येत नाही, कट करता येत नाही. अर्थवाले जास्त डोकं चालवत असतील तर हे बरोबर नाही. आदिवासी खातं, सामजिक न्याय खातं कशासाठी आहे? इतर खात्यातून पैसे वर्ग करता येत नाही का? परंतू हे असं करतात. लाडकी बहीण योजनेला पैसे देणे गरजेचे आहे याची कल्पना मलाही आहे. पण तुम्ही यामध्ये जातीयवाद करू शकत नाही. तुम्ही असे म्हणू शकत नाही की सामाजिक न्यायचे पैसे काढले आणि ते दलित बहीणींना दिले, अशा शब्दात सामाजित न्यायमंत्री संजय शिरसाठ यांनी संताप व्यक्त केला आहे.

## पाकची क्षेपणास्त्र चाचणी



### जम्मू काश्मिर पोलिसांकडून ७५ जणांना अटक : पाकिस्तानमधून आयातीवर बंदी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :
पाकिस्तानने शनिवारी अब्दाली या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. या क्षेपणास्त्राची क्षमता ४५० किमी आहे. आहे. या क्षेपणास्त्राची चाचणी कोणत्या ठिकाणी करण्यात आली हे पाकिस्तानने उघड केलेले नाही.

दुसरीकडे, भारताने शनिवारी पाकिस्तानमधून होणाऱ्या आयातीवर बंदी घातली. या निर्णयाबाबत सरकारने अधिसूचनाही जारी केली आहे. यासोबतच भारतीय बंदरांवर पाकिस्तानी जहाजांच्या आगमनावरही बंदी घालण्यात आली आहे. बंदरे आणि जहाज वाहतूक मंत्रालयाने सांगितले की, भारतीय जहाजेही पाकिस्तानी बंदरांवर जाणार नाहीत.

सरकारच्या या निर्णयांदरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी सांगितले की दहशतवाद हा मानवतेसाठी सर्वात मोठा धोका आहे. शनिवारी हैदराबाद हाऊसमध्ये अंगोलाचे अध्यक्ष लॉरेन्को यांच्याशी झालेल्या भेटीत मोदींनी हे सांगितले.

पहलगामच्या बैसरन खोऱ्यात झालेल्या दहशतवादी हल्ल्याप्रकरणी जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी पीएसए (सार्वजनिक सुरक्षा कायदा) अंतर्गत ७५ जणांना अटक केली आहे. याची पुष्टी आयजी व्ही.के. यांनी केली.

देशात, मध्य प्रदेशातील जबलपूर आणि महाराष्ट्रातील चंद्रपूर येथील ऑर्डनन्स फॅक्टरीजमधील कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. व्यवस्थापनाने कर्मचाऱ्यांना सांगितले की हा एक कठीण काळ आहे आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने काम थांबू नये.

## दीपक केसरकर घेणार राजकारणातून संन्यास ?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे माजी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी राजकारणातून संन्यास घेण्याचे संकेत दिलेत.



राजकारण हे निवडणुकांपुरते असते. मी पदाला चिकटून राहणारा व्यक्ती नाही. यापुढे निवडणूक लढवण्याची माझी इच्छा नाही, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे.

एकनाथ शिंदे यांची नुकतीच कुडाळ येथे सभा झाली होती. या सभेला दीपक केसरकर यांनी दांडी मारली होती. यामुळे ते मंत्रिपद नाकारल्यामुळे नाराज असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली होती. पण आता हृदयावरील 'बायपास' शस्त्रक्रियेमुळे ते शिंदेंच्या सभेला उपस्थित नव्हते हे स्पष्ट झाले आहे. त्यांनी स्वतःच याची माहिती दिली आहे. तसेच राजकारण सोडण्याचेही संकेत दिले आहेत.

दीपक केसरकर यांच्या हस्ते शनिवारी सावंतवाडी मतदारसंघात १३ रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले, राजकारण हे निवडणुकांपुरते असते. मी पदाला चिकटून राहणारा माणूस नाही. त्यामुळे यापुढे माझी निवडणूक लढवण्याची इच्छा नाही. केवळ जनतेची सेवा करणे हेच माझे कर्तव्य आहे असे मी मानतो. कारण, याच जनतेच्या आशीवार्दाने काही दिवसांपूर्वी मला पुनर्जन्म मिळाला. त्यामुळे मी माझे जीवन जनतेच्या सेवेसाठी समर्पित करत आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे दीपक केसरकर यांनी यापूर्वी अनेकदा आपल्या नाराजीची चर्चा फेटाळून लावली होती. मी नाराज नाही. मागील अडीच वर्षांपासून मी मंत्रिपदी होतो. इतरांना संधी मिळायला हवी. आता माझे वय वाढत आहे. त्यामुळे आगामी काळात कुणीतरी उठून बाजूला व्हा असे म्हणण्यापेक्षा आपणच बाजूला झालेले बरे, असे ते म्हणाले होते. यावरून ते राजकारण सोडणार असल्याचे बोलले जाते.

### भारतावर १० लाखांहून अधिक सायबर हल्ले

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :
पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर महाराष्ट्र सायबर सेलने पाकिस्तानसह विविध देशांमधील हॅकिंग गटांकडून भारतीय प्रणालींवर १० लाखांहून अधिक सायबर हल्ले नोंदवले आहेत. मुंबईतील सायबर विभागाशी संबंधीत अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. महाराष्ट्र सायबर सेलने २२ एप्रिल नंतर सायबर हल्ल्यांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे लक्षात आणून दिले आहे.

पहलगाम हल्लयानंतर भारतावर 10 लाखांहून अधिक सायबर हल्ले झाले असल्याचे महाराष्ट्र सायबर विभागाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक यशस्वी यादव यांनी सांगितले. भारतीय वेबसाइट्स आणि पोर्टल्सना लक्ष्य करणारे हे हल्ले पाकिस्तान, मध्य पूर्व भाग, इंडोनेशिया आणि मोरोक्को येथून करण्यात आले होते, असेही त्यांनी सांगितले. यातील अनेक हॅकिंग गटांनी स्वतःला इस्लामी गट असल्याचे सांगितले आहे, राज्य पोलिसांच्या सायबर गुन्हे शोध शाखा असलेल्या महाराष्ट्र सायबर सेलने यापैकी बरेच हल्ले रोखले आहेत. त्यांनी सरकारमधील सर्व सरकारी विभागांना त्यांच्या सायबर पायाभूत सुविधा मजबूत करण्यास सांगणारा एक सल्लागार तयार केला आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

## मणिपूर हिंसाचाराची दोन वर्ष काँग्रेसचे प्रधानमंत्र्यांवर टीकास्त्र




■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :
मणिपूरमध्ये दोन समुदायांमधील हिंसाचाराला ३ मे रोजी दोन वर्षे पूर्ण झालीत. यावरून काँग्रेसने भाजपवर निशाणा साधला. 'पंतप्रधान मोदी मणिपूरपासून अंतर राखत आहेत. गृहमंत्री अमित शहा राज्यातील परिस्थिती हाताळण्यात अपयशी ठरले आहेत, अशी टीका काँग्रेसने केली.

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले, मणिपूरमध्ये १३ फेब्रुवारीपासून राष्ट्रपती राजवट लागू आहे, परंतु सध्याची विधानसभा विसर्जित केलेली नाही, ती फक्त निलंबित करण्यात आली आहे. अनेक नागरी संघटना विरोधात आहेत.

कुकी-मैतेई समुदायातील संघर्ष ३ मे २०२३ रोजी सुरू झाला, जो आजही सुरू आहे. या दोन वर्षांत ३०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. १५०० हून अधिक जण जखमी झाले. ७० हजारांहून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. ६ हजारांहून अधिक एफआयआर नोंदवण्यात आले आहेत.

दरम्यान, शनिवारी, मैतेई-नियंत्रित इंफाळ खोऱ्यातील मैतेई ग्रुप कोऑर्डिनेशन कमिटी फॉर मणिपूर इंटिग्रिटी आणि डोंगराळ जिल्ह्यांमध्ये झोमी स्टुडंट्स युनियन, कुकी स्टुडंट्स ऑर्गनायझेशन यांनी बंदचे आवाहन केले. या काळात संपूर्ण राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये आणि इतर संस्था बंद राहिल्या.

### मंत्री म्हणाले, आत्मघातकी बॉम्बर बनण्यास तयार..



■ वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. ३ :
कर्नाटकचे गृहनिर्माण आणि अल्पसंख्याक कल्याण मंत्री बी. झेड. जमीर अहमद खान यांचे पहलगाम दहशतवादी हल्ल्यावरील विधान चर्चेत आहे.

ते म्हणाले, पाकिस्तान नेहमीच भारताचा शत्रू राहिला आहे, जर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी मला परवानगी दिली, तर मी आत्मघातकी बॉम्ब आणि हल्ला करून पाकिस्तानात जाण्यास तयार आहे. मी देशासाठी माझे जीवन देण्यास तयार आहे.

मी याबद्दल खूप गंभीर आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर केंद्र सरकारने निर्णायक कारवाई करावी. प्रत्येक भारतीयाने दहशतवादाविरुद्ध एकत्र आले पाहिजे.

## अर्धांगवायू झालेल्या बिबट्यावर फिजिओथेरपी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटरच्या नावात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. अर्धांगवायूने चारही पाय जवळजवळ गमावलेला बिबट्या तब्बल दीड वर्षांच्या उपचारानंतर त्याच्या पायावर उभाच झाला नाही तर तो चक्क धावायला देखील लागला आहे.



वन्यप्राण्यांवरील उपचारासाठी आणि त्यांना त्यांचा नैसर्गिक अधिवास परत मिळवून देण्यासाठी भारतातील पहिले ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटर नागपूर येथे तयार झाले.

कळमेश्वरजवळील निलगाव येथील ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटरच्या बचाव पथकाने जखमी झालेल्या एका मादी बिबट्याला बेशुद्ध न करता जेरबंद केले. हे मादी बिबट जेरबंद केले तेव्हा तिचे चारही पाय काम करत नव्हते. वाहनाच्या धडकेमुळे तिच्या पायांची हालचाल बंद झाली होती. ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटरमध्ये आणताच येथील तज्ज्ञ पशुवैद्यक अधिकाऱ्यांनी तिची क्ष-किरण तपासणी केली. या तपासणीत काहीच आढळले नाही. त्यामुळे आणखी काही तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले.

चारही पाय निकामी झाल्यामुळे बिबट्याला कड फेरण्यापासून तर खाऊ घालण्यापर्यंतचे सर्व काम ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटरच्या सहाय्यकांना करावे लागत होते आणि ते अतिशय कठीण होते. कित्येकदा त्या मादी बिबट्याला वैद्यकीय साहित्याच्या सहाय्याने अडकवून ठेवावे लागत होते.

दरम्यान, याची माहिती शहरातीलच शासकीय वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालयातील ह्यफिजिओथेरपीह्ल विभागाच्या एका महिला डॉक्टरला मिळाली. त्यांनी ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटरच्या व्यवस्थापनाला त्या मादी बिबट्याला एकदा पाहू देण्याची विनंती केली. यानंतर त्यांनी सेंटरमधील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मदतीने माणसांवर करण्यात येणाऱ्या फिजिओथेरपीचा प्रयोग या मादी बिबट्यावर केला.

पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसह सेंटरमधील सहाय्यकांनाही त्यांनी हे तंत्र शिकवले. या प्रयोगाने सुरुवातीला त्या मादी बिबट्याच्या दोन पायात हालचाल निर्माण झाली. त्यानंतर समोरचा एक पाय देखील हालचाल करु लागला आणि त्यानंतर चारही पायावर मादी बिबट उभे झाले. अजिबात उठू न शकणारे ते मादी बिबट नऊ ते दहा महिन्याच्या उपचारानंतर धावायला लागले.

## साई मंदिर उडवण्याची धमकी




संस्थानला धमकीचा ईमेल : पोलिस यंत्रणा अलर्ट

■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. ३ :
पहलगाम अतिरेकी हल्ल्यामुळे अवघ्या देशात संतापाची लाट उसळली असताना आता शिर्डीचे साईसमाधी मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. यासंबंधीचा एक ईमेल साई संस्थानला मिळाला आहे. या ईमेलमुळे पोलिस प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे.

माहितीनुसार, साई संस्थानला धमकीचा एक ईमेल मिळाला आहे. त्यात साईसमाधी मंदिर पाइपबॉम्बने उडवण्याचा इशारा देण्यात आला आहे. या मेलमध्ये आणखी काय आहे? हे स्पष्ट झाले नाही. पोलिसांनी यावर भाष्य करणे टाळले आहे. पण यामुळे सुरक्षा यंत्रणांत एकच खळबळ माजली आहे. या धमकीनंतर पोलिसांनी मंदिर परिसराची तपासणी करून तेथील सुरक्षा व्यवस्था चोख केली आहे. हा खरेच धमकीचा ईमेल आहे की, कुणी खोडसाळपणा केला आहे, याचा तपास पोलिस घेत आहेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे केंद्रीय मंत्री सी आर पाटील यांनी शुक्रवारीच साईसमाधीचे दर्शन घेतले होते. त्यावळी त्यांनी पहलगाम हल्ल्याप्रकरणी पाकला कसे प्रत्युत्तर दिले जाईल हे तुम्ही पहाच असे सूचक विधान त्यांनी केले होते. त्यानंतर काही तासांतच साई संस्थानला धमकीचा ईमेल प्राप्त झाल्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. पाटील यांच्या उपस्थितीत काल राहता येथील गोदावरी कालव्याच्या नुतनीकरणाच्या कामाला सुरुवात झाली. या कार्यक्रमात त्यांनी पहलगाम हल्लूयाचा दाखला देत सत्कारही नाकारला होता.

## श्री लैराई यात्रेत चेंगराचेंगरी

### ७ जणांचा मृत्यू, ४० हून अधिक जखमी

■ वृत्तसंस्था, पणजी, दि. ३ :
गोव्यातील शिरगाव येथे श्री लैराई यात्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ७ जणांचा मृत्यू झाला. शनिवारी सकाळी माध्यमांमध्ये ही बातमी आली. या अपघातात ४० हून अधिक लोक जखमी झाले असून त्यापैकी २० जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. प्रशासनाकडून बचावकार्य सुरू आहे. मृतांचा आकडा वाढू शकतो.

घटनेची माहिती मिळताच मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी उत्तर गोवा जिल्हा रुग्णालय आणि बिचोलिम रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली. तसेच, आवश्यक असलेल्या सर्व वैद्यकीय सुविधा पुरवण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. यात्रेत सहभागी होण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक जमले होते. त्यानंतर गर्दीत गोंधळ उडाला, ज्यामुळे चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली.

श्री लैराई यात्रा हा एक प्रमुख हिंदू धार्मिक उत्सव आहे जो शिरगाव गावात, बिचोलिम तालुका, गोवा येथे आयोजित केला जातो. हा उत्सव दरवर्षी एप्रिल किंवा मे महिन्यात होतो. ही जत्रा २ मे रोजी संध्याकाळपासून ३ मे रोजी सकाळपर्यंत चालला. याच दरम्यान हा अपघात झाला.



## कधीतरी सीएम होण्याचा योग : अजित पवार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

विधानसभा निवडणुकीच्या आधी अजित पवारांनी किमान पाच वेळा मुख्यमंत्री होण्याची इच्छा व्यक्त केली होती. तीच इच्छा त्यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा जाहीर केली. त्यांच्या पक्षातर्फे वरळी येथे १ ते ४ मे कालावधीत महाराष्ट्र राज्य स्थापना दिवस आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या निमित्ताने गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव साजरा होत आहे. त्यात २ मे रोजी विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. त्यात अजित पवारांनी मनातील भावना व्यक्त केली. सत्कारमूर्ती महिला राही भिडेंच्या एका वक्तव्याचा धागा पकडत ते म्हणाले, मलाही वाटतं मी मुख्यमंत्री व्हावं. पण कुठं जमतंय. कधी ना कधी सीएमपदाचा योग येईल. योग येणारच नाही असे नाही. महिलांना उद्देशून पवार यांनी सांगितले की, ममता बॅनर्जी पं. बंगालमध्ये मुख्यमंत्री झाल्या. जयललितांनी स्वतःच्या तमिळनाडूत ताकदीवर राज्य मिळवले. हा शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे, इथंही महिला मुख्यमंत्री होऊ शकते. महोत्सवात ज्येष्ठ पत्रकार राही भिडे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, पार्श्वगायिका बेला शेंडे, धावपटू ललिता बाबर, नेमबाज राही सरनोबत,ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल, कबड्डीपटू अभिलाषा म्हात्रे तसेच राज्यसभा तालिका सभापतिपदी निवडीबद्दल सुनेत्रा पवारांचाही सत्कार करण्यात आला.




## अजित पवार, शिंदे मुख्यमंत्री होणार नाहीत : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

अजित पवार मुख्यमंत्री होतील हा योग कधी येईल? असा प्रश्न उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्री पदाबाबत आशा व्यक्त केली होती. यावरुन राऊत यांनी त्यांच्यावर निशाणा साधला. या संबंधीत प्रसार माध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, मी नेहमी म्हणतो की, छगन भुजबळ जर शिवसेनेमध्ये आणखी काळी राहिले असते तर मुख्यमंत्री झाले असते. नारायण राणे अजून काही काळ शिवसेनेत राहिले असते तर ते शिवसेनेतून पुन्हा मुख्यमंत्री झाले असते. मनोहर जोशी झाले ना! ते पक्षाबरोबर निष्ठेने राहिले त्यामुळे मुख्यमंत्री झाले. मात्र, एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होणार नाहीत आणि अजित पवार देखील जोपर्यंत भारतीय जनता पक्षासोबत आहेत तोपर्यंत मुख्यमंत्री होणार नाहीत. जर हे दोन्ही पक्ष भाजपमध्ये विलीन झाले तर ते कदाचित भारतीय जनता पक्षाचे मुख्यमंत्री होतील. हे त्यांना अमित शहा यांनी देखील सांगितले आहे. हे आधीच मी दैनिक सामनामध्ये लिहिले देखील असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा गट जर भाजपमध्ये विलीन झाला. तर सिद्धरमय्या यासारखे ते भाजपचे एक मुख्यमंत्री होऊ शकता. तसे झाले तरच एकनाथ शिंदे किंवा अजित पवार हे मुख्यमंत्री होऊ शकतात, हे मी आधीच सांगितलं आहे, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.



## लाडकी बहीण योजनेचे बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्याची प्रक्रिया सुरू : आदिती तटकरे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

महायुती सरकारच्या महत्त्वाकांक्षी "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" या योजनेचा एप्रिल महिन्याचा हप्ता अद्याप लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा झालेला नाही. एप्रिल महिना संपूनही रक्कम न मिळाल्यामुळे अनेक लाभार्थी महिलांनी प्रश्न उपस्थित केले होते. मात्र, यासंदर्भात अखेर राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी महत्त्वाची माहिती सांगितली आहे. लाभार्थी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यांमध्ये एप्रिल महिन्याचा हप्ता (2 मे) जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे आदिती तटकरे यांनी सांगितले.महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी ही योजना राबवली होती. यामध्ये दरमहा राज्यातील पात्र महिलांना 1500 रुपये आर्थिक सहाय्य दिले जाते. निवडणूक प्रचारादरम्यान महायुतीच्या नेत्यांनी या रकमेचे वाढवून 2100 रुपये प्रतिमहिना देण्याचे आश्वासन दिले होते, मात्र या वाढीव रकमेबाबत अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही.



## सुषमा अंधारे अजित पवार गटात जाणार? अंजली दमानिया यांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

अंजली दमानिया तुम्हाला किती तो प्रसिद्धीझोतात राहण्याचा सोस.. कधीतरी अधिकृत माहिती घेत चला ब्रॉडकास्टिंगवरील मेसेजचा अर्थ काय घ्यायचा असा सवाल ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी त्यांना विचारला आहे. तर दमानिया यांना प्रसिद्धी झोतात राहण्याची खूप हौस आहे, त्यासाठी असे माहिती न घेता केवळ चर्चेत राहण्यासाठी त्याअसे काहीतरी वृत्त पेरण्याचा प्रयत्न करत आहे, असे दिव्य मराठी डिजिटलशी बोलताना अंधारे यांनी म्हटले आहे. सुषमा अंधारे पुढे बोलताना म्हणाल्या की, अंजली दमानिया या माज्या पीआर टीममध्ये काम करत आहे का? की त्यांनी ठरवून ओबीसी नेते आणि चळवळ संपवण्याची मोहीम हाती घेतली आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. अंजली दमानियांचा एक ब्रॉडकास्टिंग ग्रुप आहे त्यावरुन पत्रकारांच्या संपर्कात असतात, यामध्ये त्यांनी सुषमा अंधारे अजित पवार गटात प्रवेश करणार? असा मेसेज पाठवला होता.



## पॅलेस्टाईन सोबत आमचा धर्म जुळला
### त्यांचे झेंडे जाळायला विरोध : आ. अबू आझमी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :


आपल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे कायमच चर्चेत राहणारे समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी पुन्हा एकदा त्याच पद्धतीचे वक्तव्य केले आहे. पॅलेस्टाईन सोबत आमचा धर्म जुळला आहे. त्यांचे झेंडे जाळले तर आम्ही त्याचा विरोध करू, अशी भूमिका अबू आझमी यांनी मांडली आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा त्यांच्या वक्तव्यावरून वाद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर देशामध्ये हिंदू विरुद्ध मुस्लिम असा वाद निर्माण केला जात असल्याचा आरोप अबू आझमी यांनी केला.



# खतासोबत लिंकिंग आढळल्यास कायदेशीर कारवाई : माणिकराव कोकाटे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

राज्यातील खत विक्रेत्यांनी कोणत्याही स्वरूपात खतासोबत लिंकिंग केल्याचे आढळल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिले आहेत. सह्याद्री अतिथीगृह येथे घाऊक व किरकोळ खत विक्रेत्यांच्या माफदा (महाराष्ट्र खते, कीटकनाशके, बियाणे विक्रेते संघटना) संघटनेने पुकारलेल्या खत



खरेदी बंद आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत हे निर्देश देण्यात आले.

या बैठकीस कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी संचालक सुनिल बोरकर, खत पुरवठादार, उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, माफदा संघटनेचे सदस्य आणि कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.कृषीमंत्री ॲड. कोकाटे यांनी स्पष्ट केले की, खत विक्रेत्यांनी लिंकिंगचे कोणतेही खत खरेदी करू नये.

जर कोणी सक्ती केल्यास, विक्रेत्यांनी तात्काळ कृषी विभागाकडे तक्रार नोंदवावी. तसेच, तालुका आणि जिल्हा पातळीवर कृषी विभागाने याबाबत काटेकोर पाहणी करावी, असेही त्यांनी सांगितले.

खत उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींनी यापुढे कोणत्याही प्रकारे लिंकिंग न करण्याचे आश्वासन बैठकीत दिले. यामुळे माफदा संघटनेने कृषीमंत्री कोकाटे यांचे आभार मानत खत खरेदी बंदचे आंदोलन मागे घेण्याचा निर्णय जाहीर केला. माफदा संघटनेचे अध्यक्ष विनोद तराळ आणि सचिव बिपिन कासलीवाल यांनी संघटनेचे म्हणणे मांडले. तराळ यांनी सांगितले की, काही कंपन्या लिंकिंगद्वारे खत पुरवठा करत असल्यास शासनाने यावर कठोर भूमिका घ्यावी. याला समर्थन देत, फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडियाचे सचिव डी. रामाकृष्ण आणि महाराष्ट्र शाखेचे प्रतिनिधी सुरेश शेटे यांनी खत उत्पादक कंपन्यांची बाजू मांडली. त्यांनी अनुदानित खतांबाबतची सद्यःस्थिती, जमिनीची सुपीकता राखण्यासाठी सेंद्रिय, जैविक आणि नॅनो खतांच्या वापराबाबत धोरणाची माहिती दिली.

या बैठकीतून शासनाने खत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणि शेतकऱ्यांचे हित जोपासण्यासाठी कठोर पावले उचलण्याचे संकेत दिले आहेत. लिंकिंगच्या विरोधात कारवाई आणि शेतकऱ्यांना दर्जेदार खते मिळावीत यासाठी कृषी विभाग सक्रिय राहणार आहे.

## रिअल इस्टेटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली विंग कमांडरची फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ३ :

रिअल इस्टेटच्या व्यवसायात गुंतवणुक करण्याबाबत विश्वास संपादन करुन त्या मोबदल्यात चांगला परतावा देण्याबाबतचे आश्वास देऊन विंग कमांडरची ९० लाखांची आर्थिक फसवणुक करण्यात आली आहे. याप्रकरणी काळेपडळ पोलिस ठाण्यात अजय यादव, विशाल सेठ ( रा.कोंढवा,पुणे) यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विंग कमांडर कलीम अली बेग (वय- ५२,रा. उंड्री,पुणे) यांनी आरोपी विरोधात फिर्याद दिली आहे. सदरचा प्रकार सन २०२१ पासून आतापर्यंत घडलेला आहे. तक्रारदार यांना आरोपींनी रिअल इस्टेटचा व्यवसायात गुंतवणुक करण्याबाबत चर्चा केली. त्यांनी गुंतवणुक केल्यास त्यांना चांगला परतावा गुंतवणुकीवर देण्याचे आश्वासन दिले गेले. त्यामुळे तक्रारदार यांनी आरोपी यांचे ब्रान्डलान्स कंपनीचे खात्यावर एकूण ९० लाक सात हजार रुपये वेळोवेळी पाठवले. सदरचे पैसे हे कर्मा रिॲलिटी यांचेकडे गुंतवणुक केले आहे. असे सांगत आरोपींनी तक्रारदार यांच्याशी नोटरी करारनामा केला. नोटरी करारनाम्यात आरोपींनी तक्रारदार यांना पिसोळी येथील रिजॉईस होम्स याठिकाणी प्लॅट सी ८०४ देण्याचे मान्य केले. परंतु एक वर्षानंतर तक्रारदार यांनी आरोपींकडे केलेल्या गुंतवणुकवर फायदा व मुळ रक्कम मागणी करत विचारणा केली. त्यावेळी आरोपींनी सदर रक्कम देण्यास टाळाटाळ केल्याने तक्रारदार यांनी कर्मा रिॲलटी लेटर पॅडवरील पत्र व नोटरी करारनामा बाबत माहिती घेतली असता, सदर लेटरपॅड व साईन व शिक्का बनावट असल्याचे उघड झाले. तसेच सदर करारनाम्यात असणारा ३ बीएचके सदानिका ही कर्मा रिॲलिटी यांनी दिलेली नाही. सदानिका नंबर हा रिफ्युजी एरिआ असल्याचे तक्रारदार यांना समजले व आरोपींनी विश्वास संपादन करुन सदर रकमेची फसवणुक केल्याने त्यांनी याबाबत काळेपडळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## सीईटी फेरपरीक्षेसाठी सज्ज
### २२ हजार जणांना प्रवेशपत्र

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

एमएचटी सीईटीच्या पीसीएम गटाची २७ एप्रिल रोजी सकाळच्या सत्रात घेतलेल्या परीक्षेत आलेल्या चुकीच्या पयार्यांमुळे ५ मे रोजी घेण्यात येणाऱ्या फेरपरीक्षेसाठी शुक्रवारी विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र जारी करण्यात आले. त्यानंतर एका दिवसांमध्ये २२ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेशपत्र डाऊनलोड केले.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून घेतलेल्या एमएचटी-सीईटी २०२५ (पीसीएम गट) परीक्षेच्या सकाळच्या सत्रामध्ये इंग्रजी माध्यमातील गणित विषयाच्या प्रश्नपत्रिकेत २१ प्रश्नांचे पर्याय चुकीचे आले होते. २७ एप्रिल रोजी सकाळच्या सत्रात इंग्रजी, मराठी व उर्दू माध्यमांतून झालेल्या या परीक्षेला २७ हजार ८३७ उमेदवार उपस्थित होते. पर्याय चुकीचे आलेल्या विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारींची दखल घेत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने २७ हजार ८३७ विद्यार्थ्यांची ५ मे रोजी फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विद्यार्थ्यांना बुधवारी मेसेज, ईमेल, व्हॉट्सॲप आणि समाजमाध्यमाद्वारे फेरपरीक्षेची सूचना दिल्या. शुक्रवारी विद्यार्थ्यांना सीईटी कक्षाकडून त्यांच्या लॉगिन आयडीमध्ये प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात आले. त्यानंतर शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत २२ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी फेरपरीक्षेसाठी प्रवेशपत्र डाऊनलोड केले.

## राज्यात पुढील आठवड्यात अवकाळीची चाहूल
### २६ जिल्ह्यांत पाऊस, वीज आणि गारपीटीचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

राज्यात सध्या हवामानात सातत्याने बदल होत आहेत. काही भागांमध्ये उन्हाचा तडाखा जाणवत असताना, काही ठिकाणी ढगाळ वातावरणाची स्थिती आहे. याच पार्श्वभूमीवर ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी राज्यातील आगामी आठवड्याच्या हवामानाचा अंदाज व्यक्त केला आहे. 3 मेपासून 10 मेपर्यंत राज्यात अवकाळी वातावरण राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती माणिकराव खुळे यांनी दिली आहे.

ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील संपूर्ण कोकण, खान्देश, नाशिक, नगर पुणे



सातारा सांगली सोलापूर, धाराशिव बीड नांदेड, गडचिरोली भंडारा गोंदिया चंद्रपूर नागपूर वर्धा अमरावती अशा 26 जिल्ह्यात उद्या शनिवार दिनांक 3 ते 10 मे पर्यंतच्या आठवड्यात ढगाळ वातावरण राहून अगदीच किरकोळ ठिकाणी एखाद्या-दुसऱ्या दिवशी वीजा, वारा व गडगडाटीचे वातावरण राहून, झालाच तर अगदीच किरकोळ पावसाची शक्यता जाणवत आहे. या वातावरणाचा प्रभाव विदर्भातील 7 जिल्ह्यांत विशेष जाणवू शकतो, तसेच एखाद्या दुसऱ्या दिवशी किरकोळ गारपीटीचीही शक्यता नाकारता येत नसल्याचे खुळे यांनी सांगितले आहे.

सध्या तरी संपूर्ण महाराष्ट्रात रात्रीचा उकाडा वा कुठेही उष्णतेच्या लाटेची शक्यता जाणवत नाही. अरबी समुद्रात सुमारे दीड किमी उंचीवर प्रत्यावर्ती चक्रीय वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. हे वारे घड्याळाच्या काट्याच्या दिशेने फिरतात आणि त्यांच्यासोबत उत्तरेकडून येणारे आर्द्र वारे 45-50 किमी प्रतितास वेगाने महाराष्ट्रात वाहत आहेत. त्यामुळेच वातावरणीय बदल होऊन राज्यात अवकाळी पावसाचे वातावरण तयार झाल्याचे माणिकराव खुळे यांनी सांगितले. दरम्यान, शेतकऱ्यांनी विशेष असे घाबरून जाऊ नये. केवळ सावधानता बाळगावी असे खुळे म्हणाले.

सध्या राज्यातील अनेक भागांमध्ये दिवसाचे तापमान 38 अंश सेल्सियस आहे. तर काही ठिकाणी विशेषतः छत्रपती संभाजीनगर, धाराशिव या जिल्ह्यात तापमानाचा पारा 40 डिग्री पार गेल्याचे जाणवते. सदरचे तापमान जळगाव, जेऊर, सोलापूर, अकोला, अमरावती, वर्धा, ब्रम्हपुरी वगळता जवळपास सरासरी इतकेच जाणवत असून उद्या पासूनच्या आठवड्यात तापमानात 1-2 अंशांची घट होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, सलग चार दिवस ब्रम्हपुरीने उच्चांकी तापमानाची नोंद केली होती. त्या नंतर इतर शहरांचे तापमान 42 अंश सेल्सियसच्या जवळपास राहिले. शुक्रवारी अकोला येथे 44.9 अंश सेल्सियसची नोंद करण्यात आली. प्रादेशिक हवामान खात्याने विदर्भात तीन दिवस यलो अलर्ट जारी केला आहे.

## देशभरातील मच्छीमारांची यंदा ॲपद्वारे जनगणना

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

देशभरातील सागरी मच्छीमारांची अचूक माहिती मिळविण्यासाठी देशाच्या पाचव्या राष्ट्रीय सागरी मच्छीमार जनगणनेला नोव्हेंबर महिन्यात सुरुवात करण्यात येणार आहे. केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या वित्तीय सहाय्याने प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत केली जाणारी ही जनगणना यंदा मोबाइल ॲपच्या माध्यमातून करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आधुनिक पद्धतीमुळे माहिती संकलन अधिक वेगात आणि पारदर्शक होईल. सागरी मच्छीमारांची ही जनगणना दर पाच वर्षांनी करण्यात येते. पारंपरिक पद्धतीने म्हणजे कागदोपत्री माहिती भरून ती कार्यालयात पाठवण्याऐवजी यंदा थेट ॲपवर माहिती संकलित करण्यात येणार आहे. ही जणगणना नोव्हेंबर - डिसेंबर या कालावधीत करण्यात येणार आहे. या गणनेसाठी श८अर-ठअश हे ॲप विकसित करण्यात आले आहे. ह्यसेंटर मरिन फिशरीज रिसर्च इन्स्टिट्यूटने (एमएफआरआय) या मोबाइल आणि टॅबवर आधारित ॲपची निर्मिती केली आहे. हे ॲप मासेमारी केंद्रे, बंदरांची माहिती, मासेमारी केली जाणारी गावे यांची माहिती पडताळण्यासाठी मदत करणार आहे.

ॲपच्या पर्यवेक्षणाचे काम सीएमएफआरआय, भारतीय मासेमारी सर्वेक्षण विभाग आणि किनारी राज्यातील मत्स्यव्यवसाय विभागातील कर्मचारी करणार आहेत. महाराष्ट्रात सुमारे ५२६ सागरी मच्छीमार गावे आहेत. सागरी मच्छीमार गावांच्या संख्येनुसार महाराष्ट्र देशात चौथ्या क्रमांकावर आहे. केवळ आकडे गोळा करण्यापुरती ही जनगणना मर्यादित नाही, ती धोरण आखण्यासाठी उपयुक्त आहे.

## दहशतवादाविरोधात एकत्र या
### प्रकाश आंबेडकरांचे उद्धव ठाकरे, थोरातांना आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

पहलगाम हल्ला प्रकरणी भारताने संघटितपणे प्रत्युत्तर दिले पाहिजे. यासाठी वंचित बहुजन आघाडीकडून मुंबईतील हुतात्मा स्मारक परिसरात आज निषेध करण्यात येणार आहे. यात राजकीय पक्षाच्या नेत्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.



दरम्यान प्रकाश आंबेडकरांनी एक पोस्ट करत म्हटलंय की, 'तुमच्या उपस्थिती आणि आवाजाद्वारे आपण सरकारला पाकिस्तान व दहशतवादाविरोधात निर्णायक पावले उचलण्याची मागणी करूया, या पोस्टमध्ये त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि काँग्रेस नेते बाळासाहेब थोरातांना टॅग करत विशेष निमंत्रण दिले आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात आपल्या 28 भारतीयांचा मृत्यू झाला आहे परंतु सरकार ठोस पावले उचलण्याऐवजी पोकळ आश्वासने देण्यात व्यस्त आहे. केंद्र सरकारने त्यांची जबाबदारी ओळखून कठोर कारवाई करावी, यासाठी आपण हे निषेध आंदोलन करत असल्याचे प्रकाश आंबेडकरांनी म्हटले आहे. तर पहलगाममधील पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याने संपूर्ण जग हादरले आहे. परंतु, भारत सरकारने आतापर्यंत पाकिस्तान आणि दहशतवादाविरुद्ध कोणतीही कठोर कारवाई केलेली नाही. दहशतवादाविरुद्ध कारवाई करण्यासाठी सरकारवर दबाव आणण्यासाठी आपण भारतीयांनी एकत्रितपणे दहशतवादाविरुद्ध कारवाई करण्याची आणि या भ्याड दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या भारतीयांना न्याय देण्याची मागणी करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

## भरधाव मर्सिडीजच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ३ :

पुण्यातील कल्याणीनगर येथे अलिशान पोर्श कारचालकाने मद्यधुंद अवस्थेत दुचाकीवरुन जाणाऱ्या तरुण व तरुणीला भरधाव वेगात धडक देऊन त्यांचा जीव घेतल्याचा प्रकार मागील वर्षी देशभर गाजला होता. त्यानंतर आता पुन्हा एकदा हिट अँड रनचा प्रकार पुण्यातील नवले ब्रीज जवळ घडला आहे. मद्यधुंद अवस्थेत एका मर्सिडीज (एमएच ०१ बीके ४६२५) कारचालकाने रस्त्यावरुन जाणाऱ्या दुचाकीला जोरात धडक दिल्याने कुणाल हुशार (रा. चिंचवड,पुणे) या तरुणाचा दुदेवी मृत्यु झाला आहे. संबंधित कारचालक हा मद्यधुंद अवस्थेत असल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केला आहे.



या अपघातातबाबत पोलिस उपायुक्त संभाजी पाटील यांनी सांगितले की, शनिवारी पहाटे साडेचार वाजता बंगळुरु -पुणे महामार्गावर वडगाव ब्रीज जवळ विशाल हॅाटेल समोर एका भरधाव वेगात असलेल्या मसीर्डीज कारची स्प्लेंडर दुचाकला जोरात धडक बसली.

या अपघातात मोटारसायकल चालकाचा दुर्दैवीरित्या मृत्यु झाला असून त्याचा सहकारी जखमी झाला आहे. या अपघातानंतर मर्सिडीज कार वडगाव ब्रिजवरील बॅरिकेड तोडून खाली असलेल्या सर्व्हिस रस्त्यावर पडली. मर्सिडीज कारचे यात मोठे नुकसान झाले असले तरी कार मधील एअरबॅगमुळे चालक आणि मर्सिडीज मधील इतर प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली आहे. याप्रकरणी आरोपींची वैद्यकीय चाचणी पोलिसांनी केली असून त्यांच्यावर बीएनएस कलम १०५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. दोन आरोपी त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीतर्फे शरद पवारांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज महाराष्ट्रातल्या सर्व माजी मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. महत्त्वाचे म्हणजे या मुख्यमंत्र्यांच्या यादीमध्ये सर्वात अग्रस्थानी शरद पवार यांचे नाव आहे. अजित पवार आणि शरद पवार यांचे दोन वेगवेगळे पक्ष झाल्यानंतर हे दोन्ही नेते अनेक कार्यक्रमात एकत्र आलेले दिसून आले आहेत. मात्र आता अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यक्रम असून त्याला शरद पवार हजेरी लावणार का? अशी चर्चा रंगली आहे.

दुसरीकडे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना देखील या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले आहे. उद्धव ठाकरे यांना पायउतार होण्यासाठी भाग पाडणारे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा देखील या कार्यक्रमात सत्कार होणार आहे. त्यातच अजित पवार यांनी देखील उद्धव ठाकरे यांची साथ सोडून महायुतीमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे आता उद्धव ठाकरे या कार्यक्रमाला उपस्थित राहणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



शरद पवार आणि अजित पवार हे अनेक कार्यक्रमात एकत्र दिसून आलेले आहेत. मात्र उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे हे अद्याप एका व्यासपीठावर आलेले नाहीत. त्यामुळे आता या कार्यक्रमादरम्यान उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे एका व्यासपीठावर येणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याआधी देखील अनेकदा एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांची समोरासमोर भेट झाली होती.

मात्र त्यांच्यामध्ये कोणताच संवाद झालेला दिसून आला नाही. दुसरीकडे उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात मात्र संवाद झालेला अनेकदा दिसून आले आहे. त्यामुळे आता उद्धव ठाकरे या कार्यक्रमाला उपस्थित राहणार का? याची उत्सुकता सर्वांमध्येच दिसून येत आहे.

## स्वारगेट बलात्कार प्रकरणात आरोपीच्या जामिनाला पोलिसांचा विरोध

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ३ :

पुण्यातील स्वारगेट एसटी स्थानकात शिवशाही बस मध्ये २५ फेब्रुवारी रोजी एका २६ वर्षीय तरुणीवर शिवशाही बसमध्ये बलात्कार केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी दत्तात्रय रामदास गाडे (वय- ३७,रा. गुनाट, ता.शिरुर,पुणे) याला अटक केली असून त्याच्या विरोधात नुकतेच न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. मात्र, त्याचे वकील जावेद खान-बीडकर यांनी दोषारोपत्र दाखल होण्यापूर्वीच आरोपीला जामीन अर्ज मिळावा, असा अर्ज दाखल केला. त्यावर न्यायालयाच्या आदेशानुसार पुणे पोलिसांच्या तपास पथकाने त्यांचे म्हणणे न्यायालयात सादर करुन आरोपीस जामीन देण्यास विरोध दर्शवला आहे.

पोलिसांनी त्यांची बाजू स्पष्ट करताना सांगितले की, स्वारगेट बस स्थानकात घटना घडली त्या दिवशी पीडितेच्या बाजूला एक वयस्कर व्यक्ती बसला होता. ती व्यक्ती देखील पिडित महिलेसोबत व आरोपी सोबत का गेली नाही? असे अर्जदार आरोपीचे म्हणणे आहे. ते पूर्णपणे दिशाभूल करणारे आहे. सदर महिला गावी जाण्यासाठी एकटी आलेली होती. तिचा संबंधित व्यक्तीशी परिचय नव्हता. याऊलट आरोपी हा गुन्हा करण्याच्या उद्देशाने पहाटेपासूनच स्वारगेट एसटी स्थानकात आल्याचे तपासात निष्पन्न झाले.

येरवडा कारागृहात झालेल्या ओळखपरेडमध्ये पीडितेने पंचासमोर आरोपीस ओळखलेले आहे. घटनास्थळावर आरोपीच्या शटार्चे बटन मिळाले आहे. हे बटन आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या शर्टच्या बटनासारखेच असल्याचे प्रयोगशाळेचा अहवाल आहे. घटनास्थळावर मिळून आलेले केसांचे नमुने व आरोपीस अटक केल्यानंतर त्याचे घेतलेले डीएनए नमुने एकच असल्याचे न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेने आपल्या अहवालात म्हटले आहे.

घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी व पीडित महिला असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीची ससून रुग्णालयात लैंगिक अत्याचाराच्या संबंधाने वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून ती सकारात्मक आहे. आरोपीच्या जी-मेल ची गुगल सर्च हिस्ट्री सायबर तज्ञ मार्फत १२/३/२०२४ ते २५/२/२०२५ दरम्यान तपासणी केली असता त्याने २२०६१ वेळा पॉर्न व्हिडिओ सर्च केले व २६८१ वेळा विविध पॉर्न वेबसाईटला भेट देऊन लैंगिक भावना वाढवणारे पॉर्न व्हिडिओ बघितल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.




# चोरीच्या दागिन्यांपासून बनविलेला 8 तोळ्याचा गोळा

## वर्धा येथून कुख्यात चोराला अटक

### गाडगेनगर पोलिसांची कारवाई




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3) –** शहरातील विविध ठिकाणावरून चोरलेले सोन्याचे दागिने वितळवून 81.123 ग्रॅम वजनाचा सोन्याचा गोळा बनविला आणि विकण्याचा प्रयत्न केला. दरम्यान गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या डीबी टीमने या कुख्यात चोराला वर्धा येथून अटक केली. प्रवीण विनायक अक्केवार (56, रा. एकोरी वार्ड क्र. 1, श्री टॉकीज चौक, चंद्रपूर) असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव आहे. आरोपीच्या ताब्यातून 6 लाख 52 हजार 512 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहेत.

पोलिस सूत्रांनुसार, कठोरा रोड स्थित उर्वशी नगरातील रहिवासी अशोक किसनराव बनसोड (67) यांच्या पत्नीची प्रकृती बिघडली होती. त्यामुळे त्यांनी पत्नीला शहरातील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले होते. त्यामुळे 19 ऑक्टोबर 2024 रोजीच्या रात्री अशोक बनसोड हे घराला कुलूप लावून मुलासह रुग्णालयात झोपायला गेले. दरम्यान, एका अज्ञात चोरट्याने त्यांच्या बंद घराला लक्ष्य करत 96 हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी, 1 लाख 44 हजार रुपये किमतीची सोन साखळी, 1 लाख 86 हजार रुपये किमतीची दुसरी एक साखळी, 1 लाख 92 हजार रुपये किमतीचे सोन्याचे बांगड्या, 21 हजार 710 रुपये किमतीचे सोन्याचे टॉप्स आणि फॅन्सी शूज, चांदीचे अँकलेट आणि 2 लाख 50 हजार रुपये रोख असा एकूण 8 लाख 92 हजार 579 रुपयांचा माल चोरून नेला. याबाबत अशोक बनसोड यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरु करून, आरोपीला वर्धा येथून अटक केली. पोलिसांनी आरोपीची चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

### 6 लाख 52 हजाराचा मुद्देमाल जप्त

आरोपी प्रवीणने चोरीचे दागिने वितळवून एक गोळा बनविला होता. पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून सोन्याचा गोळा, सोन्याची अंगठी आणि इतर वस्तू असा एकुण 6 लाख 52 हजार 512 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त सागर पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण पाटील, पोलीस निरीक्षक ब्रम्ह गिरी आणि गुन्हे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गाडगेनगर डीबी पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोजकुमार मानकर, नीलेश जुनघरे, गजानन बरडे, सुशांत प्रधान, सागर धरमकर, मतीन शेख आणि सिद्धार्थ श्रृंगारे यांनी केली.

# अखेर त्या महिलेला मिळाला न्याय

## प्रशासनाने जेसीबी लावून हटविले कुटार



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर (दि.3) –** नजिकच्या कोकर्डा येथील एका महिलेच्या राहत्या घराच्या भिंतीला गोठ्यातील कुटाराचा ढीग विनोद डाखोडे यांनी अनेक वर्षापासून लावला होता. तो ढीग हटविण्यासाठी 'त्या' महिलेने ग्रामपंचायतला अनेक निवेदने दिले होते. परंतु त्या निवेदण ग्रा.पं. प्रशासन धिम्या गतीने कार्य करीत होते. मात्र अनेक वर्षापासून गोठ्यातील कुटार सलग भिंतीला लागून असल्यामुळे त्यांच्या घराच्या भिंतीला भेगा पडल्या. त्या भेगामधून घरामध्ये जीव जंतू, किडे, विविध विषाणू घरात शिरत होते. या प्रकारामुळे या कुटुंबाच्या जीवितास धोका निर्माण झाला होता. ही सर्व माहिती कोकर्डा ग्रामपंचायत प्रशासनाला देऊन सुद्धा भोंगळ कारभारामुळे 'त्या' महिलेने अनेक वर्षापासून हा त्रास सहन केला. शेवटी 'त्या' महिलेने उपोषणाचा इशारा दिला होता. अखेर दि. 1 मे रोजी अंजनगाव सुर्जी तालुका प्रशासनाने दखल घेत तहसीलदार पुष्पा सोळंके यांच्या आदेशाने भिंतीला लावण्यात आलेले कुटार तातडीने हटविले.

ही कारवाई गटविकास अधिकारी श्रीकिसन खताळे, विस्तार अधिकारी, सचिव शंकर बादशे, उपसरपंच राजू सोळंके, तलाठी अरुण गुप्ता, खल्लार पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, रवींद्र बारड, पोलीस कॉन्स्टेबल शरद डहाके, विनोद ढगे, गोपाल सोळंके, माहुलकरयांनी केली.



## हिरुळ पूर्णा येथून दुचाकी लंपास

**अमरावती –** चांदूरबाजार ठाण्याच्या हद्दीतील हिरुळ पूर्णा येथील रहिवासी एका नागरिकाच्या घरासमोरुन दुचाकी लंपास करण्यात आली. ही घटना 29 एप्रिल रोजी उघडकीस आली. हिरुळ पूर्णा येथील रहिवासी उमेश गंगाधरराव ठाकरे (48) यांनी आपली दुचाकी ही घरासमोर उभी केली होती. रात्रीच्यावेळी अज्ञात चोरट्याने सदर दुचाकी चोरुन नेली. ही बाब लक्षात आल्यावर उमेश ठाकरे यांनी चांदूरबाजार ठाण्यात तक्रार दाखल केली.

# पायऱ्यावरून खाली पडल्याने इसमाचा मृत्यू

## भातकुलीच्या उत्तमसरा येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3)** छतावर पडलेल्या कडुलिंबाच्या झाडाचा कचरा स्वच्छ करण्यासाठी गेलेला एक व्यक्ती पायऱ्यांवरून पाय घसरून खाली पडला. त्यामुळे तो गंभीर जखमी झाला. या जखमी व्यक्तीचा नागपूरमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला. हरिहर श्रीराम सवई (69, रा. उत्तमसरा, भातकुली) असे मृताचे नाव आहे.

माहितीनुसार, भातकुली तालुक्यातील उत्तमसरा येथील रहिवासी हरिहर सवई हे झाडावरून पडलेला कचरा स्वच्छ करण्यासाठी त्यांच्या घराच्या छतावर गेले होते. स्वच्छता केल्यानंतर ते पायऱ्यावरून खाली उतरत होते. दरम्यानच त्याचा पाय घसरला आणि ते खाली कोसळले. यामध्ये त्याच्या हाताला, पायाला आणि छातीला गंभीर दुखापत झाली. कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने हरिहर यांना इर्विन रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिथे प्राथमिक उपचारानंतर हरिहरला नागपूर मेडिकल हॉस्पिटलमध्ये रेफर करण्यात आले. जिथे उपचारादरम्यान हरिहर सवईचा मृत्यू झाला. बडनेरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# शिक्षकांच्या बदल्या स्थगित; 5 मे रोजी सुनावणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3)** जिल्हांतर्गत बदली प्रक्रियेला 24 एप्रिलपासून सुरुवात झाल्यानंतर पात्र शिक्षकांनी सुटकेचा श्वास सोडला होता. असे असतानाच काही जिल्ह्यातील शिक्षकांनी या बदली प्रक्रियेतील निकषांच्या अनुषंगाने कोर्टात धाव घेतली, त्यामुळे बदली प्रक्रियेला स्थागिती देण्यात आली आहे. तसा मेसेज बदली पोर्टलवर झळकला आहे. याप्रकरणी आता 5 मे रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाकडे शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांची जिल्हांतर्गत बदली प्रक्रिया ग्रामविकास विभागाकडून ऑनलाइन पद्धतीने राबविली जाते. 24 एप्रिलपूर्वी सर्व शिक्षकांना आपली माहिती ऑनलाइन भरण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार 100 टक्के शिक्षकांनी माहिती भरली. त्यामुळे जिल्ह्यात किती जागा मंजूर आहेत? व किती शिक्षक कार्यरत आहेत? यासंबंधिचे चित्र स्पष्ट झाले होते. यानंतर गुरुवारपासून पोर्टलवर रिक्त जागांची माहिती भरण्याचे काम सुरू झाले होते. यासाठी 28 एप्रिल पर्यंत डेडलाइन होती. असे असतानच जिल्ह्यातील व इतर जिल्ह्यातील काही शिक्षकांनी बदली प्रक्रियेच्या अनुषंगाने न्यायालयात धाव घेतली. त्यानुसार न्यायालयाने जिल्हांतर्गत बदली प्रक्रियेला स्थगिती देत 5 मे रोजी सुनावणी ठेवली आहे. न्यायालयाच्या या आदेशानंतर बदली प्रक्रियेच्या पोर्टलवरही तसा मेसेज झळकला आहे. त्यामुळे आता न्यायालयाच्या निर्णयाकडे बदलीपात्र शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

या मुद्यावरून न्यायालयात धाव–

आपसी आंतरजिल्हा बदली प्रक्रियेचा ज्या शिक्षकांनी लाभ घेतला आहे, अशा दोन शिक्षकांना त्या-त्या जिल्ह्यात सेवा ज्येष्ठतेचा लाभ घेताना जो शिक्षक सेवेने कनिष्ठ आहे, त्याचीच सेवा ज्येष्ठता त्यांना जिल्हांतर्गत बदलीमध्ये देण्यात येईल, असा शासन निर्णय आहे. आंतरजिल्हा बदली झालेल्या अशाच काही शिक्षकांनी न्यायालयात धाव घेतली आहे. कनिष्ठ शिक्षकांप्रमाणे सेवा ज्येष्ठता बदलीसाठी ग्राह्य धरावी, असे त्यांचे म्हणणे आहे.

### संचमान्यतेवर 12 मे रोजी सुनावणी

संचमान्यतेच्या अनुषंगाने 15 मार्च 2024 रोजी शासन निर्णय काढला आहे. या आदेशामुळे एकेका जिल्ह्यातून शेकडोच्या संख्येने पदे कमी होणार आहेत. हा शासन निर्णयच रद्द करण्यात यावा, यासाठी प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे व काही शिक्षकांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आहे. या प्रकरणात आता 12 मे रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे या सुनावणीत नेमके काय होते? न्यायालय काय निर्णय देते? याकडे शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

# तरुणाची गळफास लावून आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3) –** एका तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना 3 मे रोजी खोलापुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. सतिश सुधाकर मडावी (27, रा. महाजनपुरा, परदेशीपुरा) असे मृताचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिस सुत्रानुसार, निखीलचा मोठा भाऊ सतिश हा महाजनपुरा परिसरात भाड्याने खोली करून एकटाच राहत होता. त्याचे लग्न झाले नव्हते. तो वाहनचालक म्हणून काम करीत होता. 2 मे रोजी तो कामावर गेला नाही. निखील हा घरी आला असता, सतिशने जेवण केले. त्यानंतर निखील हा घरी गेला आणि सतिश हा घराच्या स्लॅबवर झोपला. त्यानंतर 3 मे रोजी सकाळी निखील यांचे घरमालक विनायक तानळे (रा. छाया कॉलनी) यांनी फोन करून निखीलला सांगितले की, सतिशने पंख्याला दुप्पटा बांधून गळफास घेतलेला आहे. या माहितीवरून निखील घटनास्थळी पोहोचला असता, त्यावेळी सतीश हा गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यानंतर या घटनेची माहिती खोलापुरी गेट पोलिसांना देण्यात आली. सतिश हा काही दिवसांपासून विचारात राहत होता. त्यामुळे 2 मे रोजीपासून त्याचा चेहरा काही वेगळा दिसत होता, असे निखीलने पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले. सतिशच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर त्याच्या पार्थिवाला नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. या घटनेची माहिती निखील सुधाकर मडावी (26, रा. छाया कॉलनी) यांनी दिली. त्यानुसार पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद केली आहे.

# बांधकाम विभागात कोट्यवधींचा सूचना फलक घोटाळा?

- कागदोपत्री नोंद प्रत्यक्षात फलक गायब
- आरटीआय कार्यकर्त्यांची लोकायुक्तांकडे तक्रार

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, (दि. 3) –** दर्यापूरच्या विशेष प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक 2 अंतर्गत सूचना फलक खरेदीच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून हे प्रकरण आता लोकायुक्त न्यायालयात पोहोचले आहे. ग्रामपंचायत सदस्य अभिषेक गावंडे यांनी याबाबत 2 एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्य लोकायुक्त व उप लोकायुक्त न्यायालयात अधिकृत तक्रार दाखल करून हा घोटाळा चव्हाट्यावर आणण्याचा प्रयत्न केला आहे.

गावंडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दर्यापूर सार्वजनिक बांधकामट्ट विभागाअंतर्गत विविध मार्गांवर अपघातप्रवण ठिकाणी सूचना फलक लावण्याच्या नावाखाली सुमारे सहा कोटी रुपयांचा खर्च दाखवला गेला. प्रत्यक्षात मात्र बहुतांश ठिकाणी फलकच लावले गेले नाहीत आणि जेथे लावले गेले तेथे ते चुकीच्या ठिकाणी होते. यातून सूचना फलकांच्या व्यवहारात कोट्यवधींचा घोळ करण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे, असे गावंडे यांनी तक्रारीत म्हटले आहे. गावंडे यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत विविध पुरावे गोळा करून तक्रार दाखल केली असून, संबंधित अधिकारी व ठेकेदारांनी शासनाच्या पैशांची उधळपट्टी केली आणि सरकारी यंत्रणेला गृहित धरले, असे तक्रारीत नमूद केले आहे. सूचना फलकांची खरेदी प्रक्रिया पारदर्शक नव्हती, कोटेशन, निविदा आणि वर्क ऑर्डर यांसारखी मूलभूत कागदपत्रेही उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. सीएसआर दर आणि प्रत्यक्ष खरेदी दरांमध्ये मोठा फरक असल्याचा दावा गावंडे यांनी केला आहे.

ही कामे सारडा इन्फ्रा (अकोला), एस. एम. इंडस्ट्रीज (अकोला) आणि आरएमएस इंडस्ट्रीज (जळगाव) या कंत्राटदार कंपन्यांमार्फत करण्यात आली आहेत. या कंत्राटदारांना काम कोणत्या निकषांवर देण्यात आले, हे एक गूढ असल्याचे गावंडे यांनी म्हटले आहे. या संपूर्ण व्यवहाराचा हिशेब संबंधितांकडून मागविण्यात यावा आणि आणि दोषींना लोकायुक्त न्यायालयाने जाब विचारावा, अशी ठाम भूमिका गावंडे यांनी मांडली आहे. तक्रारीत तत्कालीन कार्यकारी अभियंता प्रतीक गिरी व इतर तीन उपविभागीय अभियंते, तीन ठेकेदार, तसेच सचिव (रस्ते, सा.बां. विभाग), मुख्य अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. शिवाय, माहिती अधिकारी हेमंत भोये यांनी माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन करून माहिती लपवण्याचा प्रयत्न केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. जनतेच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या प्रत्येक जबाबदार अधिकाऱ्याला आता लोकायुक्त न्यायालयात उत्तर द्यावंच लागेल. कुणालाही पळवाट मिळणार नाही, असा इशारा अभिषेक गावंडे यांनी दिला आहे. त्यांच्या या तक्रारीमुळे संबंधितांमध्ये तसेच प्रशासकिय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

> मी सामाजिक बांधिलकीतून स्वखर्चाने माहिती अधिकार कायद्यान्वये पुरावे गोळा केले. जनतेच्या पैशाचा असा गैरवापर होत असताना गप्प बसणे म्हणजे स्वत:च्या कर्तव्याशी गद्दारी करण्यासारखे आहे. म्हणूनच ही तक्रार लोकायुक्त न्यायालयात दाखल केली आहे. कोणताही अधिकारी, ठेकेदार किंवा वरिष्ठ अधिकारी हा कायद्याच्या वर नाही. या प्रकरणातील प्रत्येक जबाबदार व्यक्तीला उत्तर द्यावंच लागेल आणि त्यांच्यावर कठोर कारवाई होईपर्यंत मी शांत बसणार नाही. ही एक लढाई आहे, पारदर्शक प्रशासन आणि जनतेच्या हक्कासाठी!
>
> **अभिषेक पंजाबराव गावंडे**
> **जिल्हा अध्यक्ष, माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ अमरावती**

# जातनिहाय जनगणनेवरून काँग्रेसची बॅनरबाजी, भाजपची टिका




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3)** केंद्र सरकारने नुकतेच जातीय जनगणना होणार असल्यास जाहीर केले. त्यामुळे अमरावती शहरात काँग्रेस पक्षाच्या नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर व काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे यांनी संपूर्ण अमरावती शहरात जोरदार बॅनरबाजी केली आहे. आता जातीय जनगणना होणार असा उल्लेख यामध्ये करत, बहुजन की जीत है राहुलजी का संघर्ष. जिसकी जितनी हिस्सेदारी उसकी उतनी भागीदारी, असा उल्लेख या बॅनरमध्ये करण्यात आला. राहुल गांधी यांच्या संघर्षाला यश आलं, त्यांनी सातत्याने जातीय जनगणनेची मागणी केली होती. त्यामुळे आता त्याची तातडीने अंबलबजावणी व्हावी अशी मागणी यावेळी काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी केली.

दरम्यान जातनिहाय जनगणनेवरून अमरावती शहरात काँग्रेस चे बॅनर झळकल्या नंतर भाजप आ. प्रताप अडसड यांनी टिका केला आहे.अमरावती शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरामध्ये काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूरसह खा. बळवंत वानखडे यांचे बॅनर लागले आहेत. जातनिहाय जनगणनेकरीता राहुल गांधी यांच्या प्रयत्नांना यश असल्याचे काँग्रेस चे म्हणणे आहे. दरम्यान यावरून भाजप आमदार प्रताप अडसड यांनी काँग्रेसवर टिका केली आहे. काँग्रेस सरकार मध्ये 7 वेळा जनगणना झाली, मात्र ती जातनिहाय जनगणना नव्हती. काँग्रेसला जातनिहाय जनगणना करायचीच नव्हती, आता जनगणना होत आहे तर राहुल गांधीचं यश म्हणणं हास्यास्पद आहे, असे आमदार प्रताप अडसड म्हणाले. पंतप्रधान मोदींच्या निर्णया नंतर आता जातनिहाय जनगणना होईल तेव्हा प्रत्येक जात किती आहे ते लक्षात येईल. तेव्हा खऱ्या अर्थाने प्रत्येक समाजाला न्याय देणे शक्य होईल.

त्या दुष्टीने केंद्र सरकार ने हा निर्णय घेतला,असेही ते म्हणाले. काँग्रेस सरकारच्या काळात सात वेळा जनगणना झाली तेव्हा ते स्वत– जातनिहाय जनगणना करू शकले नाही.केवळ आग्रह त्यांनी धरला म्हणुन आता जातनिहाय जणगणना होत आहे,असे म्हणणे हास्यास्पद आहे. जातीय जनगणनेचे चे श्रेय घेण्याच्या धावपळीत काँग्रेस नेते आहे, अशी प्रतिक्रिया आमदार प्रताप अडसड यांनी दिली आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# सिंधु जल करार : स्थगिती आणि परिणाम

पहलगाम मधील अतिरेकी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी सिंधू जल करार स्थगित केला. केंद्रीय मंत्री सी.आर.पाटील यांनी घोषणा केली की भारत सरकार अशी योजना आखत आहे की पाण्याचा एक थेंबही पाकिस्तानला मिळणार नाही. अर्थात ही गोष्ट एवढी सोपी आहे का?

---------------------



सिंधु आणि तिच्या उपनद्यांचे पाकिस्तानकडे जाणारे पाणी पुर्णपणे अडवण्यासाठी भारताला भाक्रानांगल सारखी कमीतकमी २२ धरणे बांधावी लागतील. तेंव्हा कुठे पाकिस्तान मध्ये वाहून जाणारे पाणी त्यात साठवता येईल आणि पाकिस्तानला पाण्यापासून वंचित करता येईल.

इतक्या मोठ्या प्रमाणात धरणे बांधणे हे खूपच खर्चिक काम आहे. शिवाय त्याकरता १५ ते २० वर्षांचा कालावधी लागू शकेल. तेंव्हा पाकिस्तानला जाणाऱ्या पाण्याचा थेंब न थेंब भारत लगेच अडवेल अशा प्रकारची जी वक्तव्ये केली जात आहेत, ती वस्तुस्थितीला धरून नाहीत.

या बाबतीत सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की सिंधु आणि तिच्या उपनद्यांचे पाणी हे काही एका नळात साठवलेले नाही, की तो बंद केला म्हणजे पाणी बाहेर यायचे थांबणार आहे.

आता सिंधु जल कराराबाबत थोडक्यात माहिती घेऊया. सिंधु जल करार हा जागतिक बॅंकेच्या मध्यस्थीने, भारत आणि पाकिस्तान यांच्यात सप्टेंबर १९६० मध्ये करण्यात आला. या करारानुसार रावी बियास आणि सतलज या पुर्वेकडील नद्यांचे पाणी वाटप भारताला करण्यात आले, तर सिंधु झेलम आणि चिनाब या पश्चिमेकडील नद्यांचे ८० टक्के पाणी वाटप पाकिस्तानला करण्यात आले. उरलेले २० टक्के पाणी भारताला शेतीसाठी आणि जलविद्युत प्रकल्पांसाठी मर्यादितरित्या वापरण्याची परवानगी देण्यात आली.

यावरुन नंतर वेळोवेळी भारत आणि पाकिस्तान यांच्यात वाद झाले.पाकिस्तानने भारताच्या काही जलविद्युत आणि पायाभूत प्रकल्पांना आक्षेप घेतला. त्यामुळे पाकिस्तानला वाहून जाणाऱ्या पाण्याचा प्रवाह कमी होईल अशी शंका पाकिस्तानने व्यक्त केली. याचे कारण म्हणजे या पाण्यावर पाकिस्तानची सुमारे ९० टक्के शेती अवलंबून आहे. तसेच पाकिस्तानचे एक तृतीयांश जलविद्युत प्रकल्प या पाण्यावर अवलंबून आहेत.

पाकिस्तानला वाटप केलेल्या पश्चिमेकडील नद्यांचे पाणी अडवणे वाटते तितके सोपे नाही, याचे कारण ते अडवण्यासाठी लागणाऱ्या साठवणाची पायाभूत सुविधा भारताकडे सध्या तरी नाही. त्याचप्रमाणे ते पाणी भारतातच दुसरीकडे वळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात कालव्यांची गरज आहे.ती सुविधा सध्यातरी भारताकडे उपलब्ध नाही.



अभय गोखले

खरे पाहता पश्चिमेकडील नद्यांचे २० टक्के पाणी, जे भारताच्या वाट्याला आले आहे तेही आपण आजवर पूर्णपणे वापरू शकलेलो नाही.जर आपण गेल्या ६४ वर्षात मोठ्या प्रमाणात कालवे बांधू शकलो असतो तर आपल्या वाट्याचे सर्व पाणी आपण हरयाणा राजस्थान या पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या राज्यांकडे वळवू शकलो असतो. पाण्यावरून पंजाब आणि हरियाणा या राज्यांमध्ये नेहमीच झगडे सुरू असतात.

सध्या या नद्यांवर भारतातर्फे जे जलविद्युत प्रकल्प उभारण्यात आले आहेत, त्यांना जास्त पाणी साठवणाची गरज भासत नाही. वीज निर्मिती झाली की ते पाणी खाली वाहत जाते. त्यामुळे या प्रकल्पांची पाणी साठवण्याची क्षमता मर्यादित आहे.

आता सिंधु जल करार स्थगित केल्यानंतर भारताला, सध्याच्या पायाभूत प्रकल्पांत काही सुधारणा करता येतील, शिवाय नवीन कालवे खोदून पाणी मोठ्या प्रमाणात साठवता येईल आणि भारतातील हरयाणा आणि राजस्थान या राज्यांकडे ते पाणी वळवता येईल. गेल्या काही वर्षांत भारताने जे प्रकल्प हाती घेतले आहेत त्यांची प्रगती फारशी समाधानकारक नाही.

सध्या आपल्याकडे जी साठवण क्षमता आहे, त्यानुसार कोरड्या हंगामात पाणी अडवण्याचा काही परीणाम पाकिस्तानवर होऊ शकेल. कारण त्या काळात पाण्याची उपलब्धता अतिशय कमी असते. पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी भारताकडे फ्लड डेटा (पुराची आकडेवारी) हे अस्त्र आहे.

जून ते सप्टेंबर या काळात या नद्यांना महाभयंकर पूर येतो.सिंधु जल करारानुसार भारताला हा फ्लड डेटा पाकिस्तानला पुरवावा लागतो. कारण या फ्लड डेटा नुसार पाकिस्तान, आपल्या पाटबंधारे, जलविद्युत प्रकल्प, पिण्याचे पाणी यांचे नियोजन करत असतो.

आता हा करार स्थगित केल्यानंतर फ्लड डेटा पाकिस्तानला पुरवणे भारतावर बंधनकारक नसल्याने पाकिस्तान मधील शेतीवर आणि पाटबंधारे प्रकल्पांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो.

सर्वात शेवटी पाकिस्तानला अद्दल घडवण्यासाठी भारत, वॉटर बॉम्ब चा वापर करू शकतो. यासाठी भारत, तात्पुरत्या काळासाठी पाणी मोठ्या प्रमाणात अडवू शकेल आणि पाकिस्तानला कोणतीही सूचना न देता ते पाणी अचानकपणे खाली सोडू शकेल, त्यामुळे पाकिस्तान मधील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान तर होईलच शिवाय तेथे पूरपरिस्थिती निर्माण होईल.

●●●●●●

# भ्याड दहशतवादी हल्ला!

**(कालच्या अंकावरून पुढे)**

संसदेवर दहशतवादी हल्ला झाला तेव्हाही सर्व दहशतवादी संसदेच्या प्रांगणातच ठार मारले गेले. मुंबईवरील आणि संसदेवरील हल्ल्यात दहशतवादी हे लष्करी गणवेषात होते. तसेच पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यातही दहशतवादी लष्करी गणवेषात होते. दुर्दैवाने पुलवामा येथील हल्ल्यात पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा म्हणून कोणाला पकडून जगाला दाखवता आलेला नाही. पहलगाम येथे हत्याकांड घडविणारे दहशतवादी कसे-कुठे पसार झाले ते अजून समजलेले नाही.

गेली सहा दशके जम्मू काश्मीरला घटनेतील ३७० कलमानुसार विशेष दर्जा होता. जम्मू-काश्मीरचा झेंडा सुध्दा वेगळा होता. केंद्राने केलेले कायदे काश्मीरच्या विधानसभेने मंजूर केल्यावर तिथे लागू होत असत. काश्मीरमध्ये हिंदुस्थानातील कोणात्याही व्यक्तीला मालमत्ता खरेदी करता येत नव्हते. मोदी सरकारने ३७० वे कलमच काढून घेतले, त्यावर संसदेने शिक्कामोर्तब ही केले. जम्मू-काश्मीरचे विभाजन करून लेह-लद्दाख वेगळा केला. काश्मीर हा केंद्रशासित प्रदेश केला. काश्मीरला विधानसभा दिली, पण पूर्ण दर्जा अजून मिळालेला नाही. मुख्यमंत्र्यापेक्षा जास्त अधिकार तेथील उपराज्यपाल यांना आहेत.

उत्तरार्ध

अशा मुद्दयावरून काश्मीरमध्ये असंतोष व अशांतता कशी निर्माण होईल यासाठी पाकिस्तान सतत प्रयत्न करीत असतो. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनीर हे भारताच्या विरोधात नेहमीच गरळ ओकण्याचे काम करीत असतात.

१६ एप्रिल २०२५ रोजी इस्लामाबाद येथे एका परिषदेत ते म्हणाले, काश्मीर ही पाकिस्तानच्या गळ्यातील नस आहे, ती कधीही विसरली जाणार नाही. काश्मिरी बांधवांना त्यांच्या शौर्यपूर्ण संघर्षात एकटे सोडणार नाही पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा असिफ म्हणाले, भारताने पाकिस्तान शहरात घुसून कारवाई केल्यास त्याची किमत भारताला मोजावी लागेल. जर पाकिस्तानी नागरीकांना काही इजा झाली, तर भारतीय नागरीक सुरक्षित राहणार नाहीत.

पहलगाममध्ये निरपराध पर्यटकांच्या भीषण हत्याकांडानंतर भारताने गप्प बसून सहन करावे असे पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांना वाटते काय? पहलगाम हत्याकांडानंतर त्याच्याशी आमचा काही संबंध नाही, हल्ला करणारे स्वातंत्र्य सैनिक असू शकतात अशी प्रतिक्रिया पाकिस्तानने व्यक्त केली होती म्हणूनच अजमल कसाबसारखा दहशतवादी चेहरा जिवंत पुरावा म्हणून भारताला, जगाला पुन्हा एक्दा दाखवावा लागेल.

पहलगामची घटना म्हणजे पाकिस्तानकडून भारतावर हमाससारखा झालेला हल्ला आहे. आता भारत सरकार इस्त्रायलप्रमाणे सडेतोड उत्तर देणार, याची सारे जग वाट पाहत आहे. खरेतर पहलगाममध्ये हत्याकांड घडवून पाकिस्तानने भारताच्या विरोधात फार मोठा जुगार खेळला आहे.

टी.व्ही. स्टुडिओत बसून पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्याची वल्गना करणारे अँकर आणि जनतेतील उन्मादी कोलाहल सरकारने आटोक्यात ठेवणे ही काळाची गरज आहे. युद्ध आणि मुत्सद्देगिरी हे गंभीर विषय टीआरपीसाठी वापरले जाऊ शकत नाहीत.

देशातील व्हीआयपी आणि व्हीव्हीआयपी यांची संख्या जगात सर्वाधिक आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी हजारो प्रशिक्षित सुरक्षा कर्मचारी गुंतले आहेत. त्याची खरच गरज आहे का? एकीकडे सैन्य संख्या रोडावत आहे, तेथे अग्निवीरसारखी कंत्राटी योजना राबविण्यात येते तर दुसरीकडे या तथाकथित अति महत्त्वाच्या व्यक्तींना संरक्षण देण्यासाठी प्रशिक्षित कमांडोजची नेमणूक करण्यात येते आणि काश्मीरमध्ये दोन हजार पर्यटक असलेल्या ठिकाणी एकही सुरक्षा कर्मचारी नसणे हे कितपत योग्य आहे याचा विचार केला पाहिजे.

भारताच्या सीमेवरील भौगोलिक व राजकीय परिस्थिती, प्रचंड मोठी सागरी सीमा लक्षात घेता अग्निवीर योजनेचा गांभीयार्ने पुनर्विचार होणे गरजेचे आहे. सहा महिन्यांच्या प्रशिक्षणाच्या आधारे हे अग्निवीर सियाचिन, पूर्वोत्तर खडतर प्रदेश, पश्चिमेच्या वाळवंटात कसे टिकाव धरतील?

चार वर्षांच्या सेवेनंतर ७५ अग्निवीर सेवानिवृत्त होणार याचे दडपण त्यांच्यावर नक्की असणार हासुद्धा महत्त्वाचा घटक आहे. नौदल आणि वायुसेनेतील अग्निवीरांसमोर तर तंत्रज्ञान आणि समुद्रावरील जीवनाशी जुळवून घेण्यासाठी किमान दीड ते दोन वर्षे जातील, हे नाकारता येत नाही.

नुकतेच तातडीने सरकारने अत्यंत कडक निर्णय घेतले ते किती परिणामी ठरतात ते काळच ठरवेल. सरकारने बोलाविलेली सर्वपक्षीय बैठक हे स्वागतार्ह पाऊल होते परंतु या बैठकीत सहभागी होण्याऐवजी मा. पंतप्रधान बिहार दौऱ्यावर जाणे मात्र खटकणारे आहे. काश्मीर प्रश्न सोडविण्यासाठी कोणतीही जादूची छडी उपलब्ध नाही, तो केवळ मुत्सद्दीपणाने सुटू शकतो याबाबत तज्ज्ञाज्ध्ये एकमत आहे.

पाकिस्तान भारताच्या तुलनेत सर्व आघाड्यांवर खूप मागे आहे. जसे तो राजकीय अस्थिरता, लोकशाही मूल्यांचा ऱ्हास यामुळे प्रदीर्घ काळ ग्रासला आहे, तेथील अर्थव्यवस्था डबघाईस तर महागाई, बेरोजगारी आणि परकीय कर्जाचे ओझे हे विक्रमी पातळीवर पोहोचले आहे.

दहशतवाद पोसल्याची किंमत त्यांना मोजावी लागत आहे. तर संयम, अराजकीय आणि धर्मनिरपेक्ष सैन्य, विकसनशील अर्थव्यवस्था आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही ही आपली बलस्थाने आहेत. देशभरात या पर्यटकांना श्रद्धांजली वाहिली जात आहे.

-----------------

**प्रविण बागडे**
**नागपूर. 9923620919**
pravinbagde@gmail.com

■ ■ ■

# जुन्या रेजीम मध्ये व्यक्ती, वरिष्ठ नागरिक आणि अतिवरिष्ठ नागरिक यांना TDS चे दर काय आहेत?

गेल्या काही आठवड्यापासून आपण ळळ्ऊ बद्दल माहिती घेत आहोत. आज याच विषयाची नवीन माहिती सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात नेहमीच्या स्वरुपात बघणार आहोत.

**प्रश्न :** जुन्या रेजीम मध्ये इन्कमटॅक्स रिटर्न भरत असाल तर TDSचे रेट काय आहे?

● वरिष्ठ नागरिक आणि अतिवरिष्ठ नागरिक यांना सोडुन सर्व व्यक्ती (Individual) यांना कलम 192 लागु असून त्यांनी खालील रेट प्रमाणे TDS करावे लागते.

| एकूण उत्पन्न | टॅक्स |
|---|---|
| a) उत्पन्न 250,000 पर्यंत | NIL |
| b) उत्पन्न 250,001 ते 500,000 | ( एकूण उत्पन्न (-) 250,000 ) x 5% |
| c) 500,001 ते 10,00,000 | 12,500 +(एकूण उत्पन्न – 500,000)x20% |
| d) उत्पन्न 10,00,000 पेक्षा जास्त असल्यास | 112,500 +( एकूण उत्पन्न – 10,00,000) x 30% |

वरीलप्रमाणे गणना करून जो आकडा येईल तेवढा टॅक्स हा TDS म्हणून कापावा लागेल. निवासी व्यक्ती जे 60 वर्षाच्या वरचे आहेत परंतु 80 वर्षाच्या खालचे आहेत, त्यांनी TDS खालील प्रमाणे करावे लागेल. हे सर्व ज्यांनी जुनी रेजीम पद्धत स्वीकारली त्यांच्यासाठी आहे.

| एकूण उत्पन्न | टॅक्स |
|---|---|
| a) 300,000 पर्यंत उत्पन्न | NIL |
| b) 300,001 ते 500,000 | (एकूण उत्पन्न – 300,000) x 5% |
| c) 500,001 ते 10,00,000 | 10,000 + ((एकूण उत्पन्न –500,000) x20% |
| d) 10,00,001 च्या पुढे | 110,000 + (एकूण उत्पन्न – 500,000)x 30% |

जे निवासी व्यक्ती ज्याचे वय 80 वर्षाच्या वर राहील, त्यांना खालील प्रमाणे TDS करणे आवश्यक आहे.

| एकून उत्पन्न | टॅक्स |
|---|---|
| a) 500,000 पर्यंत | NIL |
| b) 500,001 ते 10,00,000 | (एकूण उत्पन्न – 500,000) x 20% |
| c) 10,00,000 च्या पुढे | 100,000 + (एकूण उत्पन्न – 500,000) x 30% |

नोट- यात कलम 87अ चे केल्कुलेशन्स घ्यावे लागतील.

**प्रश्न :** TDS कुणाला कापायची आवश्यकता नाही ?

● आपण वर चार्टवर बघितल्या प्रमाणे निवासी व्यक्ती यांना 250,000 रु. पर्यंत एकून उत्पन्न असल्यास TDS कापण्याची आवश्यकता नाही. तसेच जे व्यक्ती 60 वर्षाच्या वर परंतु 80 वर्षाच्या आत आहे, असे वरिष्ठ नागरिक यांना 3 लाख रुपया पर्यत तथा जे व्यक्ती 80 वर्षाच्या वर आणि वरिष्ठ नागरिक आहेत, त्यांना 5 लाख रुपया पर्यत TDS कपात करण्याची गरज नाही.

**प्रश्न :** वरील आलेल्या टॅक्स वर सरचार्ज भरावा लागतो का ? किती रुपया पर्यंत सरचार्ज भरावा लागतो ? सरचार्ज चे दर काय आहेत ?

● सरचार्ज खालील प्रमाणे काढून सरकारकडे भरावा लागेल.

| एकूण उत्पन्न | दर (रेट) |
|---|---|
| 50 लाखापेक्षा जास्त परंतु 1 कोटी च्या आत | 10% |
| उत्पन्न 1 कोटी पेक्षा जास्त परंतु 2 कोटीपेक्षा खाली | 15% |
| उत्पन्न 2 कोटी पेक्षा जास्त परंतु 5 कोटी च्या आत | 25% |
| 5 कोटी पेक्षा जास्त | 37% |

**प्रश्न :** सरचार्ज कायद्याने मारजीनल रिलीफ मिळतो का?

● सरचार्ज काढताना मारजीनल रिलीफ दिला जातो. पुढील आठवड्यात आपण TDS नवीन रेजीम प्रमाणे कसे काढतात याचा सोप्या भाषेत अभ्यास करणार आहोत.




**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना

# 'नरो वा कुंजरो वा'..

शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील दोन वेगवेगळ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्ये एकत्रीकरण होणार का? हा महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा मोठा चचेर्चा विषय ठरतो आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या एकत्र येण्याच्या चर्चे दरम्यान या दोन्ही पक्षांबाबतही चांगलीच चर्चा रंगली आहे.

अलीकडेच दोन्ही गटांतील स्थानिक नेते व कार्यकर्ते देखील एकत्र येण्याची इच्छा वारंवार व्यक्त करत आहेत. जिल्हास्तरीय बैठका, कार्यक्रम, आणि समाज माध्यमावरून अशा मागण्यांचा सूर सतत उमटत आहे. त्यामुळे हा विषय पुन्हा ऐरणीवर आला आहे. यावर अजित पवार यांना प्रसार माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी 'नरो वा कुंजरो वा' अशीच भूमिका मांडल्याचे दिसून आले.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रसारमाध्यमांनी थेट विचारणा केली की, दोन राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र येणार का? त्यावर उत्तर देताना ते नम्रपणे म्हणाले की, दोन राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार, हे मी माध्यमांतूनच ऐकतोय. कार्यकर्त्यांमध्ये तशी भावना असणे स्वाभाविक आहे.



दोन्ही गटांनी असली राष्ट्रवादी कोण, यासाठी निवडणूक आयोगाकडे दावा केला. निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हे अधिकृत नाव अजित पवार गटाला दिले, तर शरद पवार गटाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार असे वेगळे नाव व चिन्ह देण्यात आले.

**ऐक्याची मागणी का?**

अनेक जिल्हा परिषद, पंचायत समित्या, आणि नगरपालिका स्तरावर दोन्ही गटांचे कार्यकर्ते एकत्र काम करत होते. फुटीमुळे स्थानिक पातळीवर गोंधळ, मत विभाजन आणि नेतृत्व संघर्ष निर्माण झाले. त्यामुळे अनेक कार्यकर्ते म्हणत आहेत, पुन्हा एकत्र येणं गरजेचं आहे.

**विधानाचा राजकीय अर्थ**

अजित पवार यांचे विधान हे मध्यम मार्गी असल्याचे दिसून येत आहे. त्यांनी स्पष्टपणे एकत्र येण्यास विरोध केला नाही, तसेच त्याला दुजोरा दिला नाही. हे विधान राजकीय द्वार उघडे ठेवणारे आहे, जे भविष्यातील सामंजस्याची शक्यता दर्शवते.

मुंबईत अजित पवार यांनी दिलेल्या या विधानामुळे, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुन्हा एकत्र येणार का? हा प्रश्न अधिक स्पष्ट झाला आहे. भविष्यात या दोन्ही गटांमध्ये खरोखरच ऐक्य होईल की सत्तासमीकरणात बदल होतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दुसरा मतप्रवाह असा की, अनेक विषयांवर महायुतीचे सरकार पूर्णतः अपयशी ठरले असून, शेतकरी, बेरोजगार, लाडक्या बहिणींमध्ये असंतोष आहे. अशा विषयांवरून लक्ष विचलीत करण्यासाठी हे असले एकीकरणाचे मुद्दे पुढे आणले जात असावेत.

■ ■ ■

# शासनकर्ते किती गंभीर?

वाचक लिहितात

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला ११ दिवस उलटून गेले. २६ निरपराध पर्यटकांना आतंकवाद्यांनी अगदीच निर्दयतेने मारले. पाक पुरस्कृज दहशतवादाची झळ भारत सातत्याने सोसतो आहे. २६/११ मुंबई हल्ला, संसदेवरील हल्ला, पुलवामा आणि कितीतरी. प्रत्युत्तरादाखल आम्ही काय करतो? आणि आमचे शासनकर्ते याविषयी किती गंभीर आहेत?


पुहलगाम हल्ल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी लगेचच सौदी अरेबियातून परतले. उच्चस्तरीय मिटींगचा सिलसिला सुरू झाला, सिंधू नदीचे पाणी पाकिस्तानला जावू देणार नाही, वगैरे वगैरे पुड्या सोडल्या गेल्या. भारतीय सैन्याला पूर्ण मोकळीक दिल्याच्या बातम्या पसरल्या. परंतु, अशाही गंभीर परिस्थितीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तिसऱ्या दिवशी बिहारमध्ये एका रॅलीला संबोधित करण्यासाठी गेले. बिहारमध्ये या वर्षीच्या अखेरीस विधानसभा निवडणुका होवू घातल्या आहेत. देशातील एकेक राज्य जिकणाऱ्या भाजपाची हाव मोठी आहे आणि बिहारही ताब्यात घ्यायचा आहे. तो त्यांनी जरूर घ्यावा, कुणाची हरकत नाही.

परंतु, देशातील २६ नागरिकांचे आतंकवादी प्राण घेतात, देशभरात संताप आहे, सरकार सर्वपक्षीय बैठक बोलावते आणि प्रधानमंत्री बिहारमध्ये प्रचारसभेत व्यस्त राहतात. यावरून, अशा घटनेचे शासनकर्त्यांना किती गांभिर्य आहे? हे दिसून येते. केंद्र सरकारने आता Xडूगिरी सोडून द्यायला हवी आणि आतंकवाद पोसणाऱ्या पाकिस्तानला कायमचा धडा शिकवायला हवा.

■ **अजित शेंडे, नागपूर.**

# उन्हाळ्यात घ्या डोळ्यांची काळजी

उन्हाळ्यात आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागते. आहारामध्ये पोषक तत्वांचा समावेश करणे गरजेचे असते. उन्हाळ्यात शरीराला देखील हायड्रेटेड ठेवा ज्यामुळे कोणत्याही प्रकारचे आजार होणार नाही. शरीरामध्ये योग्य प्रमाणात पाण्याची मात्रा असल्यामुळे तुमचं शरीर निरोगी राहाण्यास मदत होते. उन्हाळ्यातील तिव्र सूर्यप्रकाशामुळे डोळ्यांची आग होते किंवा त्यांच्यामधून सतत पाणी येते. ही स्थिती गंभीर नाही परंतु जास्त काळ दुर्लक्ष केल्यास डोळ्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.



**उन्हाळ्यात डोळ्यातून पाणी येण्याची कारणे**

धूळ आणि प्रदूषण - उन्हाळ्याच्या दिवसात धूळ आणि प्रदूषण जास्त असते, ज्यामुळे डोळ्यांमध्ये जळजळ आणि अॅलर्जी होऊ शकते.

डिहायड्रेशन - शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे डोळे कोरडे पडतात आणि जळजळ होऊ लागते.

तीव्र सूर्यप्रकाश - तीव्र सूर्यप्रकाशाचा डोळ्यांवर परिणाम होतो, ज्यामुळे डोळे लाल होऊ शकतात आणि त्यांच्यात जळजळ जाणवू शकते.

ॲलजी - उन्हाळ्यात, हवेत परागकण, धूळ आणि इतर ॲलर्जीक कण जास्त असतात, ज्यामुळे डोळ्यांना खाज सुटू शकते आणि पाणी येऊ शकते.

संसर्ग - उन्हाळ्यात बॅक्टेरिया आणि विषाणू वेगाने पसरतात, ज्यामुळे डोळ्यांच्या बुबुळाच्या पुढील भागाचा होणारा दाह सारखे आजार होऊ शकतात.

जास्त स्क्रीन टाइम - मोबाईल, लॅपटॉप आणि टीव्हीचा जास्त वापर केल्याने डोळे थकतात आणि त्यांना कोरडेपणा आणि जळजळ होऊ शकते.

जर डोळ्यांत जळजळ आणि पाणी येत राहिले तर ते काही गंभीर आजारांचे लक्षण असू शकते, जसे की नेत्रश्लेष्मलाशोथ, जो एक संसर्गजन्य रोग आहे ज्यामध्ये डोळे लाल होतात, सुजतात आणि पाणी येते.

ड्राय आय सिंड्रोम जेव्हा डोळ्यांमध्ये पुरेसा ओलावा नसतो तेव्हा ते कोरडे होऊ लागतात आणि जळजळ होते. एलर्जीची प्रतिक्रिया देखील एक कारण असू शकते. काही लोकांना उन्हाळ्यात ॲलर्जीच्या समस्या जास्त असतात, ज्यामुळे डोळ्यांना खाज सुटणे, पाणी येणे आणि लालसरपणा यासारख्या समस्या उद्भवू शकतात. काचबिंदू हे देखील एक कारण आहे. जर डोळ्यांमध्ये सतत वेदना आणि अंधुक दृष्टीची समस्या असेल तर हे काचबिंदूचे लक्षण असू शकते, ज्यावर वेळेवर उपचार न केल्यास अंधत्व येऊ शकते.

**डोळ्यांची काळजी कशी घ्यावी?**

शरीर हायड्रेटेड ठेवल्याने डोळे ओले राहतात आणि जळजळ होण्याची समस्या येत नाही. सनग्लासेस घालाः उन्हात बाहेर पडताना डोळ्यांचे तेजस्वी सूर्यप्रकाशापासून संरक्षण करण्यासाठी अतिनील-संरक्षण चष्मे घाला. दिवसातून २-३ वेळा स्वच्छ पाण्याने डोळे धुल्याने धूळ आणि घाण निघून जाते व जळजळ कमी होते.

जास्त वेळ मोबाईल आणि संगणक वापरणे टाळा आणि मध्येच ब्रेक घ्या. थंड पट्टी लावा झ डोळ्यांवर थंड पट्टी ठेवल्याने जळजळ आणि सूज कमी होते. योग्य झोपेअभावी डोळ्यांवर ताण येतो, ज्यामुळे डोळ्यांना जळजळ आणि पाणी येऊ शकते. डोळ्याचे थेंब वापरा झ डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतर योग्य डोळ्याचे थेंब वापरा, जेणेकरून डोळे ओले राहतील.

हिरव्या भाज्या, फळे आणि व्हिटॅमिन ए समृद्ध असलेले अन्न खाल्ल्याने दृष्टी आणि आरोग्य राखण्यास मदत होते.

■ ■ ■

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



**फिप्टी – फिप्टी ..!**

घराचे व्यवस्थापन
करते बाई
सशक्त आधार
पुरुष देई . .

दोघाविना संसार
असे अधूरा
स्त्रीपुरुष समानता
अंतरी स्विकारा . .!

अर्धनारी नटेश्वर
समानतेचे प्रतिक
धर्मशास्त्र हेच सांगते
आता तरी ऐक !

# पोलिस आयुक्तांच्या नावे बनविले बनावट फेसबुक

**अनेकांना संदेश पाठवून केली पैशांची मागणी ● यापूर्वी जिल्हाधिकारी यांच्या नावेही बनविले होते फेसबुक खाते**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3)** सायबर गुन्हेगारीचे प्रस्त देशभरात वाढत असताना, हे सायबर गुन्हेगार सर्व सामान्यसह शासकीय अधिकार्यांच्या नावाचा दुरुपयोग करू लागले आहेत. अमरावती शहर पोलिस आयुक्तालयाचे पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या नावे आता बनावट फेसबुक तयार करून काही जणांना संदेशाद्वारे पैशांची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार शनिवारी पुढे आला आहे. यापूर्वी जिल्हाधिकारी यांच्या नावे बनावट फेसबुक तयार करण्यात आल्याचे आढळून आले होते. याबाबत अमरावती सायबर पोलिस ठाण्याने तत्काळ दखल घेत संबंधित बनावट फेसबुक तत्काळ बंद केले आहे.

शहरातील चार ते पाच नागरिकांना पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या नावाने असणार्या फेसबुक खात्यावरून फ्रेंड रिक्वेस्ट प्राप्त झाल्या होत्या. यामध्ये सीपींच्या नावे असणार्या फेसबुकवरून काही जणांना संदेश प्राप्त झाले. काहींनी उत्तर दिले, की ठीक आहे सर. परंतू संबंधित फेसबुक खात्यावरून नागरिकांना त्यांचे मोबाईल नंबर मागण्यात आले. सीपी नवीनचंद्र रेड्डी यांच्या नावाने फेसबुक खाते असल्याचे पाहून नागरिकांना आश्चर्य वाटले. दरम्यान काही जणांना संबंधित फेसबुक खात्यावरून प्राप्त झालेल्या संदेशात सांगण्यात आले की, माझा मित्र संतोष कुमारची सीआरपीएफमध्ये बदली झाली आहे. त्याचा मित्र रेफ्रिजरेटर, टीव्ही आणि वॉशिंग मशीन विकण्याबद्दल संदेशात सांगण्यात आले. त्यामुळे या संदेशाबाबत काही नागरिकांना संशय आला आणि त्यांनी ही बाब पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर पोलिस आयुक्तांनी तात्काळ सायबर पोलिसांना याची माहिती दिली आणि त्यानंतर सायबर पोलिसांनी संबंधित फेसबुक खात्याची तपासणी केली असता, ते फेसबुक खाते फेक असल्याचे आढळून आले. त्यामुळे सायबर पोलिसांनी तत्काळ ते बनावट फेसबुक खाते बंद केले.



> माझ्या नावाने बनावट फेसबुक अकाउंट तयार करून काही नागरिकांना मेसेज करण्यात आले होते. ही बाब लक्षात येताच तत्काळ ते बनावट फेसबुक खाते सायबर पोलिसांमार्फत बंद करण्यात आले आहे. बनावट फेसबुक तयार करणारा गुन्हेगार हा राजस्थानचा रहिवासी असल्याचे समोर आले आहे. पुढील तपास सुरू आहे.
>
> **नवीनचंद्र रेड्डी, पोलिस आयुक्त**

> बनावट फेसबुक खाते तयार करणारा आरोपी हा राजस्थानचा असल्याचे तपासात पुढे आले आहे. यापूर्वी चार ते पाच प्रकरणे पुढे आली होती. त्यामुळे यापूर्वी दाखल एफआयआरमध्ये हा गुन्हा समाविष्ट करण्यात आला आहे. बनावट फेसबुक धारक आरोपीचा शोध घेतला जाईल.
>
> **अनिकेत कासार, सहायक पोलिस निरीक्षक, सायबर पोलिस ठाणे.**

### सायबर गुन्हेगार राजस्थानमधील रहिवासी

अमरावती शहर सायबरच्या टिमने सीपींच्या नावे बनविलेले बनावट फेसबुक तत्काळ बंद केले. त्यानंतर संबंधित फेसबुक खाते कोणाचे आहे आणि ते कोणी बनविले याचा शोध घेतला असता, ते बनावट फेसबुक हे राजस्थान येथे बनविण्यात आल्याचे दिसून आले. सायबर गुन्हेगार हा राजस्थानचा रहिवासी असल्याची बाब समोर आले आहे. यापूर्वीही अमरावती शहरात काही जणांचे बनावट फेसबुक तयार करण्यात आल्याचे प्रकार उघडकीस आले आहे. त्यावेळी संबंधित फेसबुकधारकाविरुध्द सायबर पोलिसांनी आयटी कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविला आहे. त्यामुळे सीपींच्या नावे बनावट फेसबुक तयार करणार्या सायबर गुन्हेगारावर आयटी अ‍ॅक्टनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### आतापर्यंत शहरात चार ते पाच प्रकरणे

अमरावती शहरात आतापर्यंत बनावट फेसबुक खाते तयार केल्याबाबतचे चार ते पाच प्रकरणे पुढे आले आहेत. यापूर्वी जिल्हाधिकारी यांच्यासह तीन ते चार अन्य प्रतिष्ठीत नागरिकांच्या नावाने बनावट फेसबुक तयार करण्यात आले होते. आता तर चक्क पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या नावे तयार करण्यात आले आहे. हे बनावट फेसबुक खाते रिमुव्ह करण्यात आले असून, यापूर्वी झालेल्या एफआयआरमध्ये हे प्रकरण समाविष्ट करण्यात आले असल्याची माहिती सायबर पोलिस ठाण्यातील अधिकार्यांनी दिली.



# क्रीडाईच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीचे शानदार पदग्रहण

**शहराच्या विकासात क्रीडाईचे योगदान वाढेल- प्रदेशाध्यक्ष प्रफुल तावरे**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3)** - सामाजिक क्षेत्रासह शहराच्या विकासात क्रीडाईचे योगदान वाढू लागले आहे, आता बांधकाम क्षेत्रात कुशल कामगारांची आवश्यकता आहे ,त्यामुळे आगामी काळात क्रीडाईच्या माध्यमातून कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल. शहराच्या विकासात आता क्रीडाई महत्त्वाची भूमिका बजावेल आणि महत्त्वाचे योगदान देईल असा विश्वास क्रीडाईचे प्रदेशाध्यक्ष प्रफुल तावरे यांनी व्यक्त केला आहे. मार्डी रोडवरील रुद्राक्ष रिसॉर्ट येथे क्रीडाई अमरावतीचा पदग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमांतर्गत नवनिर्वाचित अधिकाऱ्यांनी 2025 ते 2017 या कालावधी करिता पदभार स्वीकारला यावेळी प्रदेशाध्यक्ष प्रफुल तावरे बोलत होते.

कार्यक्रमाला क्रीडाई महाराष्ट्राचे उपाध्यक्ष सुनील कोतवाल, दिनेश ढेंगे,माजी महाराष्ट्र अध्यक्ष संतदास चावला, प्रशांत सरोदे, माजी उपाध्यक्ष महेश जाधव आणि विद्यमान अध्यक्ष निलेश ठाकरे सचिव रवींद्र गोरटे ,माजी अध्यक्ष शैलेश वानखडे, पंकज देशमुख, संजय पर्वतकर ,लक्ष्मीकांत जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी क्रीडाईचे अध्यक्ष तावरे पुढे म्हणाले की क्रीडाईच्या कार्यक्षेत्राचा विस्तार होऊ लागलेला आहे आता तो केवळ शहर निर्मितीतच नव्हे तर शहराच्या विकासातही महत्त्वाची भूमिका बजावत आहे या संस्थेने आतापर्यंत 61 शहरांमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. येत्या काळात क्रीडाई महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात सक्रियपणे कार्यरत राहून आपले योगदान देईल असा विश्वास व्यक्त केला. राज्य उपाध्यक्ष सुनील कोतवाल म्हणाले की रियल इस्टेट ही ग्लॅमरची दुनिया आहे. यामध्ये प्रत्येक व्यक्ती आपले योगदान देत असते मात्र यातील जगमगाटाने प्रभावित होऊन आपण आपल्या उद्दिष्टांपासून दूर जाऊ नये आपण त्या क्षेत्रात काम करत आहोत ते त्या क्षेत्रांच्या गरजेनुसार बदलणे आवश्यक आहे. यासोबतच येणाऱ्या काळात नवनिर्वाचित कार्यकारिणीला शहर विकास आणि विस्ताराच्या दृष्टीने आपले दृष्टिकोन तयार करावे लागेल असे आवाहन त्यांनी यावेळी केले. प्रदेश उपाध्यक्ष दिनेश ढगे म्हणाले की विविध शहरे कार्गोहब प्रमाणे विस्तारत आहेत अशा परिस्थितीत अमरावती सारख्या शहरात विमानतळ असणे ही शहराच्या विस्तारातील एक मोठी कामगिरी आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात बांधकाम क्षेत्रालाही फायदा होईल.

त्यासाठी आत्ता आपल्याला एकत्र काम करावे लागेल. अमरावतीमध्ये जी एकता दिसते ती इतर कुठल्याही शहरांमध्ये दिसत नाही ज्या पद्धतीने अमरावती शहर आणि विदर्भाचे नाव देशात उंचावत आहे ते आणखी उंचावण्यात क्रीडाईला महत्त्वाची भूमिका बजावावी लागेल असे यावेळी ते म्हणाले. अमरावतीमध्ये क्रीडाईची स्थापना करणारे संतदास चावला यांनी 2009 मध्ये केलेल्या स्थापनेपासून ते कसे काम करत आहेत. याबाबतचा आढावा सादर केला. कार्यक्रमाची प्रस्तावना मावळते अध्यक्ष निलेश ठाकरे यांनी सादर केली. माजी अध्यक्ष शैलेश वानखडे यांनी नवनिर्वाचित कार्यकारणीचा परिचय करून दिला. निर्वाचित अध्यक्ष राजन पाटील यांनी पुढील दोन वर्षात सादर केले जाणारे व्हिजन देखील यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन भूषण देशपांडे यांनी केले तर सचिव श्रीकांत धर्माळे यांनी आभार मानले. यावेळी कार्यक्रमाला शेखर खडके, नितीन डहाके, सुनील खोडे अमरावती मंडल चे संपादक अनिल अग्रवाल,ओमप्रकाश खेमचंदानी यांच्यासह शहरातील मान्यवर उपस्थित होते.

### नवनिर्वाचित कार्यकारिणीने पदभार स्वीकारला

अमरावती क्रीडाईचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून राजन पाटील यांनी पदभार स्वीकारला याशिवाय माजी अध्यक्ष निलेश ठाकरे, सचिव श्रीकांत धर्माळे, खजिनदार रवींद्र गोरटे ,उपाध्यक्ष सचिन वानखडे, कपिल आंडे, धर्मेंद्र चंदिले, अनिल विठे, सहसचिव सुदीप पेठे सहल खजिनदार कमल मालवीय,पि आर ओ.लक्ष्मीकांत जोशी,संजय पर्वतकर, सहसंयोजक भूषण देशपांडे, कार्यकारणी सदस्य रवि महल्ले, नरेंद्र किंगराणी, नितीन शेंद्रे, प्रवीण ढवळे, मंगेश हजारे, दीपक गोडवाणी,ज्ञानेश्वर हिवसे, युवा सेनेचे सीआरएम प्रतीक मालवीय,समन्वयक संचित पाटील ,राहुल पाटील, तसेच विशाखा जोशी ,व्यवसाय विकास तांत्रिक सल्लागार समितीचे नितीन शेंद्रे,प्रवीण नेतनकर,दीपक वलगावकर यांचा समावेश आहे तसेच अमन तलडा, अजिंक्य भेंडे, आशिष दुधे,एडवोकेट जयंत खरारी,मधुर लड्डा, श्रेयस पोटे यांचाही कार्यकारणी मध्ये समावेश आहे.सर्वांनी यावेळी आपल्या पदाची शपथ घेतली या कार्यकारणी पदग्रहण समारंभाला मोठ्या प्रमाणात गणमान्य उपस्थित होते.

## घरातून 2.52 लाखांचा ऐवज लांबविला

**अमरावती** - घरातून 2 लाख 52 हजार रुपयांचा ऐवज लांबविण्यात आला. ही घटना शेंदूरजनाघाट ठाण्याच्या हद्दीतील मालखेड येथे 29 एप्रिल रोजी उघडकीस आली. मालखेड येथील रहिवासी विश्वनाथ हरले (72) हे वर्षश्राद्धाच्या कार्यक्रमासाठी बाहेरगावी गेले होते. या काळात अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरात प्रवेश करुन कपाटातील 2 लाख 52 हजार रुपयांचा ऐवज लांबविला. ही बाब लक्षात आल्यावर विश्वनाथ हरले यांनी शेंदूरजनाघाट ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरुन अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

# आ. उमेश यावलकर यांनी घेतला विकासकामांचा आढावा

## मोर्शी तहसिल कार्यालयात बैठक

## प्रशासनास दिले महत्त्वपूर्ण निर्देश



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी/वरूड, (दि. 3)** - मोर्शी तहसील कार्यालयात आमदार उमेश यावलकर यांच्या अध्यक्षतेखाली मोर्शी व परिसरातील विविध समस्या आणि विकासकामांचा आढावा घेण्यासाठी एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. नागरिकांच्या अडचणी, अपूर्ण कामे आणि योजनांची अंमलबजावणी यावर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

या बैठकीत आमदार उमेश यावलकर यांनी संबंधित विभागांच्या अधिका?यांना महत्त्वपूर्ण बाबींच्या अंमलबजावणीसाठी निर्देश दिले. पांदण रस्त्यांची कामे आणि आमदार निधीतून मंजूर झालेले अपूर्ण रस्ते तातडीने पूर्ण करण्यात यावेत. तसेच, मोर्शी परिसरात नवीन एसटी बस सेवा सुरू करण्यासाठी परिवहन विभागाने आवश्यक कार्यवाही करावी, वनविभागाच्या जागेवर स्मशानभूमी उभारणीसाठी तात्काळ नियोजन करून काम सुरू करण्याच्या सूचना यावलकर यांनी दिल्या. याशिवाय, वनविभागातील अपूर्ण रस्त्यांची कामे पूर्णत्वास नेण्यावर भर देण्यात आला. राशन कार्ड केवायसी प्रक्रियेसाठी नागरिकांना येणा?या अडचणी लक्षात घेता, एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, नवीन डीपी बसवण्यासाठी महावितरण विभागाने लवकरात लवकर अंदाजपत्र तयार करून सादर करावे.

पंचायत समिती अंतर्गत जलतारा योजनेची तात्काळ अंमलबजावणी सुरू करावी, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महावितरण विभागाने खुल्या विद्युत तारांऐवजी भूमिगत केबल टाकण्याची कार्यवाही त्वरीत सुरू करावी, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. या बैठकीला तहसीलदार, गटविकास अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, बांधकाम विभागाचे अभियंते, जिल्हा परिषद अभियंता, परिवहन मंडळ, पाटबंधारे विभाग, पुरवठा विभाग, महावितरणचे अभियंते तसेच भाजपा पदाधिकारी व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# सोमेश्वर पुसतकर सांस्कृतिक महोत्सवाला अलोट प्रतिसाद

**रानडे, अनिरुद्ध जोशी व आनंदी जोशींच्या स्वरात न्हाऊन निघाले रसिक | 'अजूनही चांदरात आहे....'ला हजारो रसिकांची गर्दी**







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3)** - सोमेश्वर पुसतकर सांस्कृतिक महोत्सवांतर्गत आयोजित 'अजूनही चांदरात आहे ...' या मराठी व हिंदी गीतांच्या कार्यक्रमाला अमरातीकरांनी अलोट प्रतिसाद दिला. ऋषिकेश रानडे, अनिरुद्ध जोशी व आनंदी जोशी या नामवंत मराठी गायकांच्या स्वर मैफिलीत हजारो संगीतप्रेमी न्हाऊन निघाले.

श्री गणेशाला स्मरून मोरया मोरया... ने केलेली सुरवात सूर निरागस हो... म्हणत या मैफिलीला सुरुवात झाली. सूर निरागस हो.. म्हणताना अनिरुद्ध जोशींनी सर्वांना मंत्रमुग्ध केले , लगेच अबीर गुलाल म्हणत सुरांचे रंग त्यांनी मनमोहकपणे उधळले. त्यानंतर आनंदी जोशी यांनी 'असे कसे बोलायचे? म्हणत चौफेर सुरांचा आनंद पसरवला . स्व. सुरेश भट व सोमेश्वर यांच्या आठवणीत 'सुन्या सुन्या मैफलीत माझ्या...' हे गाणे सादर करताना खरोखर त्या दोघांच्या विना मैफल सुनी सुनी असल्याचा भास झाला. काही क्षण उदास झालेल्या मनाला आनंदी जोशीने 'मेंदीच्या पानावर...' अलगदपणे झुलविले. अजून तुझे हळदीचे अंग अंग पिवळे ग... म्हणत असताना तिने 'तेरे बिना जिया जाये ना...' हे गीत सुमधुररित्या सादर केले. मग ऋषिकेश रानडे यांनी 'कधी तू .रिमझिममणारी बरसात... म्हणत 'तेरे नाम से जी लू... तेरे नाम से मर जावू....' हे गीत ताकदीने सादर केले. सुरांच्या ह्या बुलेटट्रेन मध्ये त्याने 'मेरे सपनोकी रानी कब आयोगी...' म्हणत संपूर्ण माहोल मस्ताना केला. त्या माहोल मधेच अनिरुद्ध जोशी ने 'अभी मुझे है कही बाते थोडीसी है जिंदगी...व मितवा.... कहे धडकने तुझसे क्या हे गाणे सादर केले.

त्यानंतर त्याने संपूर्ण सभागृहाला त्याच्या सोबत 'राधा हि बावरी...' हे गीत गायला लावले. संपूर्ण रसिक प्रेक्षकांनी त्याच्यासोबत या गीताचा आनंद अक्षरशः लुटला. तिकडे राधा थोडी बावरी झाल्याबरोबर ऋषिकेश रानडे यांना राहवले नाही आणि तो 'मन उधाण वाऱ्याचे...' म्हणू लागला. त्याच वातावरणात त्यांनी देशप्रेमाची

भावना जागवणारे 'मेरा रंग बसंती चोला' सादर केले. मग ऋषिकेश रानडे ह्यांनी 'दिवाना हुवा बादल...' म्हटल्या बरोबर आनंदी जोशीने त्याला 'जरा होले होले, चलो साजना हम भी पीछे है तुम्हारे...' ची आठवण करून दिली. मग आनंदी जोशी यांची गाडी सुसाट निघाली 'कजरा मोहब्बत वाला... अखियोमे ऐसे डाला हे... सांगत असताना तिने' ये मेरा दिल प्यार का दिवाना... म्हणत सभागृहाला ताल धरायला लावला. यावेळेस वाद्यवृंदाने दिलेली साथ म्हणजे निव्वळ अप्रतिम होती.

त्यानंतर ऋषिकेश आणि आनंदी ह्यांनी 'एक मैं और एक तू... , दोनो मिले किस तरह... हे सांगितले. मग मागे राहील तो अनिरुद्ध कसला... त्याने सुद्धा ' अश्विनी ये ना.... म्हणत साद घातली. जगू कसा तुझ्या विना मी राणी ग...म्हणताच आनंदीने गाण्यात त्याला साथ दिली त्याही गाण्याला रसिक प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. त्यानंतर 'बदन पे सितारे लपेटे...' हे गाणे अनिरुद्ध ने त्याच्या एवढेच सभागृहाला म्हणायला लावले आणि रसिक प्रेक्षकांनी सुद्धा त्यास उस्फूर्त अशी साथ दिली. ऋषिकेश रानडे ने नंतर अमरावतीच्या अंबा देवीला साकड घातलं व अंबा देवीचा जागर करत 'आई उदो उदो आज गोंधळला ये...' भक्तिभावाने सादर केले. आनंदी जोशीने 'आता वाजले की बारा...' या लावणीवर सर्वांना ठेका धरायला लावला. कार्यक्रमाची सांगता करतांना आनंदी जोशी , अनिरुद्ध जोशी व ऋषिकेश रानडे ह्यांनी एकत्रितपणे 'विठ्ठलाचा गजर...' करत विठू माऊलीला साद घातली व 'माऊली माऊली...' हे गीत सादर करत सर्वात शेवटी विठू नामाचा गजर करत ही सूरमयी श्याम येथेच थांबविण्यात येत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माजी आ. बी . टी . देशमुख , आ. सुलभा खोडके , मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, डॉ प्रफुल्ल कडू व चार्टड अकाउंटंट नीलेश लाठिया यांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात केली. अविनाश दुधे यांनी सांस्कृतिक महोत्सवामागील भूमिका मांडली. यावेळी सोमेश्वर पुसतकर यांच्यावरील एक डॉक्यूमेंटरी दाखवण्यात आली. संचालन विशाल तराळ यांनी केले.

### कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांची उत्स्फूर्त गर्दी

सोमेश्वर पुसतकर मित्र मंडळ, आम्ही सारे फाउंडेशन व आझाद हिंद मंडळातर्फे संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात आयोजित या कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांची उत्स्फूर्त गर्दी होती प्रेक्षकांच्या गर्दीने संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन फुलून गेले, गॅलरी फुल झाली होती. लोकांसाठी बाहेरून खुर्च्या मागवल्या जात होत्या त्यासुद्धा लगेच संपत होत्या, रसिक प्रेक्षक मिळेल तेथे बसून कार्यक्रमाचा आस्वाद घेत होते. ज्यांना खाली जमिनीवर बसायला सुद्धा मिळाले नाही ते दाटीवाटीने एकमेकांचा सहारा घेत उभे राहून कार्यक्रमाचा आस्वाद घेत होते. भवनाच्या बाहेर सुद्धा रसिक प्रेक्षकांची उपस्थिती शेवटपर्यंत कायम होती.

## दुचाकी उसळल्याने युवकाचा मृत्यू

**अमरावती** - अमरावती येथे कामासाठी दररोज ये-जा करणाऱ्या सोनोरी येथील युवकाचा स्पीड ब्रेकरवरून दुचाकी उसळल्याने मृत्यू झाला. गुरुवारी रात्री 9 च्या सुमारास हा अपघात अमरावती-बोराळा मार्गावर झाला. पोलिस सूत्रांनुसार, आदर्श गजानन झटाले (वय 24, रा. सोनोरी) असे मृताचे नाव आहे. तो इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या दुरुस्तीचे काम करीत होता. त्यासाठी त्याची दररोज अमरावतीला ये-जा होती. गुरुवारी रात्री अमरावतीहून येत असताना चांदूर बाजार येथील रेल्वे लाइनजवळ एमएस 27 टीझेड 5581 क्रमांकाच्या त्याच्या दुचाकीने स्पीड ब्रेकरवरून जोरदार उसळी घेतली. त्यामुळे त्याच्यासकट दुचाकी रेल्वे रुळावर आदळली. यामध्ये डोक्याला गंभीर मार लागल्यामुळे आदर्शचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, या मार्गाने ये-जा करणाऱ्या नागरिकांनी त्याला तातडीने चांदूर बाजार येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.

## माजी प्राचार्य अविनाश कडूंवर विनयभंगाचा गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, (दि. 3)** - शहरातील एका प्रतिष्ठीत शाळेचे सेवानिवृत्त प्राचार्य आणि सामाजिक संघटनेचे पदाधिकारी अविनाश कडू (वय 60, रा. सिध्दार्थ हायस्कूल मागील गोवर्धन विहार) यांच्याविरुद्ध परतवाडा पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवाहित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार आरोपीने अश्लील एसएमएस व व्हॉईस कॉल करून त्रास दिला असून, घरात येऊन वाईट उद्देशाने वर्तन केल्याचेही नमूद केले आहे. तक्रारदार महिला एका खाजगी शाळेत अस्थायी स्वरूपात शिक्षिका म्हणून कार्यरत असताना त्यांची ओळख आरोपी अविनाश कडू यांच्याशी प्राचार्य पदावर असताना झाली होती. त्यामुळे त्यांच्याकडे महिलेचा मोबाईल क्रमांक होता. महिलेच्या तक्रारीनुसार, 1 मे रोजी रात्री 9.30 वाजता एका मोबाईल क्रमांकावरून व्हॉईस कॉल आला होता आणि 'घरी येतो' असे सांगितले गेले. त्यावेळी घाबरलेल्या महिलेने सकाळी या असे उत्तर दिले. त्यानंतर 1 मे रोजी सकाळी आरोपी त्यांच्या घरी आला आणि घरात वाईट उद्देशाने वागू लागल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्याचवेळी महिलेचे पती घरी आले. त्यांनी कडू यांना बळजबरीने घराबाहेर काढण्याचा प्रयत्न केला असता कडू यांनी शिवीगाळ देखील केली. या प्रकरणी परतवाडा पोलिसांनी भारतीय दंड संहिता कलम 79,333, 351(2), 352 अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीचा शोध सुरू केला आहे. पोलिसांचे पथक आरोपीच्या मागावर असून, लवकरच अटक होण्याची शक्यता आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून, संबंधित माजी प्राचार्यांच्या वर्तनाबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

# भक्तिमार्ग

## कसं मिळवायचं यश?




विदुर हे महाभारतातलं एक प्रमुख पात्र. विदुर हा थोर तत्त्वज्ञ होता. विदुराने बरंच तत्त्वज्ञान सांगितलं. त्याच्या नीतीतल्या काही गोष्टी जाणून घेतल्या तर यश मिळवणं सहजशक्य होईल.

✻ यश मिळवण्यासाठी प्रचंड मेहनत आणि संशोधन करणं गरजेचं आहे. एखादं काम करताना पूर्ण तयारीनिशी मैदानात उतरलं पाहिजे. आपण पूर्ण तयारी केली असेल तर यश नजिकच्या टप्प्यात येऊ शकतं.

✻ कोणतंही काम अर्धवट सोडू नका. अपयश आलं तरी मागे हटू नका. थांबल्यामुळे प्रेरणा कमी होऊ शकते आणि कामातला उत्साह मावळू शकतो. कोणत्याही गोष्टीची सुरूवात केल्यानंतर थांबू नका.

विदुर नीती

✻ वेळ कोणासाठीही थांबत नाही. त्यामुळे वेळेचं महत्त्व जाणून घ्या. वेळेचा दुरूपयोग करणारी व्यक्ती सुरू होण्याआधीच लढाई हरलेली असते. म्हणूनच वेळेचं मूल्य ओळखा. सगळी कामं वेळेत करा.

✻ भावनाप्रधान असणं चांगलं. तुम्ही मनाने राजे असू शकता. पण कामाच्या बाबतीत भावना मध्ये येऊ देऊ नका. आपलं उद्दिष्ट साध्य करताना भावनांना फार महत्त्व देऊ नका. कामावर लक्ष केंद्रित करा. यामुळे तुम्हाला नक्की यश मिळेल.

✻ अपयशातून धडा घ्या. सतत शिकत रहा. नव्या गोष्टी जाणून घेतल्याने तुमचं जीवन समृद्ध होत असतं याची जाणीव ठेवा. मागे राहू नका. कामाचा कंटाळा करू नका.

✻ यशाचा मार्ग तुम्हाला आनंद देणारा असेल याची काळजी घ्या. यश मिळवताना, ध्येय गाठताना दु:खी-कष्टी होऊ नका. प्रत्येक काम आनंदाने करा. फार आक्रमक होऊ नका. शांत राहण्याचा प्रयत्न करा. आक्रमकतेने काहीही साध्य होणार नाही.

✻ तुमच्या विचारांचा परिणाम सगळ्या गोष्टींवर होत असतो. नकारात्मक विचारांमुळे आत्मविश्वास आणि ध्येय डळमळीत होऊ शकतं. त्यामुळेच नकारात्मक विचार बाजूला ठेवा.

✻ इतरांशी चांगलं वागा. स्वत:पुढेच आव्हानं निर्माण करा. या आव्हानांचा सामना करायला शिका. नेहमी कंफर्ट झोनमध्ये राहू नका.

✻ स्वत:वर विश्वास ठेवा. मदत किंवा प्रोत्साहनासाठी इतरांवर अवलंबून राहू नका. चुकांना घाबरू नका. अपयश स्वीकारा आणि प्रयत्न केल्याचं समाधान मिळवा.

✻ आळस दूर ठेवा. आळस हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे. आराम करतानाही चांगले विचार मनात आणा. कामातील बदल हा देखील चांगला विरंगुळा ठरतो हे लक्षात घ्या.

## गोवंशाचं जतन कशासाठी?

**सर्व भूतांमध्ये देवाचं अधिष्ठान शोधणारी भारतीय संस्कृती आहारातील महत्त्वपूर्ण आणि पोषक घटकांनी युक्त असं दूध देणाऱ्या धेनूला देवत्व देते त्यात वावगं काही नाही. शेतीक्षेत्रात कामी येणारा हा गोवंश घरातील एक सदस्य म्हणून गणला जातो, देवाच्या नैवेद्याबरोबर गोग्रास काढला जातो, तिच्या सन्मानार्थ विशेष पुजेचं आयोजन होतं तेव्हाच संस्कृतीतील या पशूचं महत्त्व कळतं. अशा गोवंशाचं रक्षण करायला हवं.**



भूतदया हा धर्म असणाऱ्या भारतासारख्या देशात प्रत्येक प्राण्याप्रती दयाभाव दाखवणं, प्रत्येक जीवाचा आदर करणं, त्याच्या अस्तित्वाचा सन्मान करणं आणि आपल्याला उपयुक्त ठरणाऱ्या जीवाप्रती कृतज्ञता व्यक्त करणं हा संस्कारांचा एक भाग आहे. केवळ सजीवांप्रतीच नव्हे तर निर्जीवांप्रतीदेखील अशाच प्रकारची भावना असणारं हे भारतीय मन गायीला महत्त्वपूर्ण दर्जा देतं. विज्ञानाच्या आविष्काराने आज छोट्या-मोठ्या कामांमध्ये यंत्रांचं साह्य मिळणं शक्य झालं आणि जीवनशैलीला एक नवं वळण प्राप्त झालं. पण त्यापूर्वी शेती हाच चरितार्थाचा एक मुख्य भाग असताना आणि शेतीकामासाठी यंत्रांची मदत नसताना प्राण्यांची मदत घेणं स्वाभाविक होतं. म्हणूनच त्याकाळी शेतीतील कष्टाच्या कामांसाठी बैल तर घरातील दुधदुभत्यासाठी गायी पाळणं हा समाजव्यवस्थेचा एक भाग होता. गोठ्यातील जनावरांच्या संख्येवरुन सांपत्तिक परिस्थितीचं आणि समाजातील पत कोणती याचं आकलन होण्याच्या त्या काळात गायीला मातेसमान लेखणं हा संस्कार होता जो आजही भारतीय मनावर लेपित आहे. आजही भाविक गायीच्या पोटात सर्व देवदेवतांचा वास असतो या श्रद्धेने गायीला स्पर्श करुन वंदन करतात तर काही जण भरणपोषण करणारा, अमृतासमान दूध देणारा उपयुक्त पशू म्हणून तिला महत्त्वाचं स्थान देतात. पूर्वी गोदान हे एक महत्त्वपूर्ण दान समजण्यात येत असे.

अर्थात असं असलं तरी अलिकडे गोमाता हा विषय अकारण संवेदनशील बनवण्यात येत आहे. वेदांमध्ये गोभक्षण सांगितलं आहे, पाच सहस्त्र वर्षांपूर्वी भारतात गाय-बैलांचा बळी दिला जात असे, यज्ञात त्यांचं मांस खाल्लं जात असे, मधुपर्क म्हणजे गोमांसाचा प्रकार वगैरे थापा सर्रास मारल्या जातात. मुळात इंग्रजांनी वेद विकृत असल्याचं ठरवून टाकलं आणि मग त्याच दिशेने त्यांचं भाषांतर करण्यासाठी माणसांची नेमणूक करण्यात आली. आपल्यातील काही दीड शहाण्या लोकांनी त्या अनुवादाला नंदीबैलासारखी मान डोलावली म्हणजे ते भाषांतर सत्य ठरत नाही. तथापि हे समजून घेण्यासाठी स्वतःचा काही अभ्यास, वाचन आणि चिंतन आवश्यक असतं. या सगळ्या गदारोळात आपल्याला नेमकं सत्य समजत नाही. त्यातूनच संख्येने कमी असले तरी कथित पुरोगामी देशातील महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये व्यवस्थित घुसले आहेत.

प्राचीन काळापासून हिंदू स्वमाता, भूमाता आणि गोमाता अशा तीन मातांना मानतो त्याच्या श्रद्धेला मुद्दाम लाथ मारायची आणि खणखणीत प्रत्युत्तर मिळालं तर हिंदू असहिष्णु आहेत असं म्हणत ओरडा करायचा इतकंच यांचे उद्योग सुरू आहेत. अनेक गोरक्षकांनी शेकडो अपघातग्रस्त, मोकाट सोडलेल्या, अवैध पशुवधगृहातून सोडवलेल्या, आजारी अशा गायी-बैलांना वाचवलं आहे. गोपालांच्या देशात आज शुद्ध देशी गोवंश नाहीसा होतो आहे. वशिंड असणारा वंश ही आपली विशेषता आहे. देशी गाईच्या दुधा-तुपात औषधी गुणधर्म आहेत म्हणून हिंदू संस्कृतीने तिला पूज्य मानलं आहे. पण काही बुद्धिभेदी लगेचच गाय पवित्र का आहे आणि वेद-पुराण-रामायण वा महाभारतात तसा काही उल्लेख आहे का? अशी कुत्सित विचारणा करतात. याचाच दुसरा अर्थ असा की, त्यांनी स्वतः यापैकी काहीच वाचलेलं नाही याची कबुली ते देतात. तथापि किमान माहिती असावं यासाठी काही संदर्भ लक्षात घ्यायला हवा. शतपथ ब्राह्मणात गो मातेची उत्पत्ती कथा सांगितली आहे. दक्ष प्रजापतीने जीवसृष्टी निर्माण केल्यावर थोडं अमृत प्राशन केलं. त्यामुळे तो संतुष्ट झाला आणि श्वास बाहेर पडला. त्याचा सुगंध सर्वत्र दरवळला. त्यामधूनच एक गाय जन्माला आली. सुगंधातून जन्मली यास्तव तिचं नाव 'सुरभी' असं ठेवण्यात आलं. ती सर्व गोवंशाची माता ठरली. ऋग्वेदात अनेकदा 'अघ्न्या' म्हणजे अवध्य असा गायीचा उल्लेख आढळतो. तैत्तरीय ब्राह्मणात 'यज्ञो वै गौ:' अर्थात यज्ञ म्हणजे गाय (३.९.८.३) असं म्हटलं आहे. याचा एक अर्थ यज्ञाकरता लागणारं घृत, दुग्ध, दही, गोमूत्र, गोमय हे सर्व पदार्थ आणि यज्ञाचं इंधन म्हणून गोवरी तसंच यज्ञाची दक्षिणा गोप्रदानाने होत असते यास्तव गोमाता हे यज्ञाचं स्वरुप आहे. 'अन्नं वै गौ:' (३.९.८.३) अर्थात अन्न म्हणजे गाय होय. आपल्याकडे दूध हे पूर्णान्न मानलं आहे. त्यामुळे गाईचं दूध देखील प्रमुख अन्न आहे. (आपल्याकडे पयोव्रतासारखी व्रतं देखील आहेत ज्यात केवळ दुग्धपान करुन रहायचं असतं.) आपल्या भोजनात दही, ताक, तूप यासारखे घटक नित्य असतात. म्हणूनच गाय ही अन्न स्वरुपात असल्याचं म्हटलं आहे.

भक्ती विशेष

महाभारतात भीष्मांनी धर्मराजाला उपदेश केला आहे,

मातर:सर्वभूतानां गाव: सर्वसुखप्रदा:। बुध्दिमाकाङ्क्षता नित्यं गाव: कार्या प्रदक्षिणा:।। सन्त्याङ्यं न तु पादेन गवां मध्ये न च व्रजेत्। मङ्गलायतनं देव्यस्तस्मात्पूज्या: सदैव हि। । (अनु.७.८)

'गायी या सर्व भूतांच्या माता आहेत. त्या सर्वसुखप्रदान करणाऱ्या आहेत. सुखाची, अभिवृद्धीची कामना असेल त्यांनी गायींची सेवा करावी, तिला प्रदक्षिणा घालावी. गायीला लाथ मारु नये किंवा कळपात घुसून त्रास देऊ नये. गायी या मंगलांचं स्थान आहेत. त्यामुळे त्या सदैव पूज्य आहेत.' भीष्मांसारखा आचारसंपन्न, अपराजीत योध्दा धर्मराजाला हा उपदेश करतो त्याचाच अर्थ गोपालन हे राजाचं कर्तव्य आहे असा होतो. पुढे तू हे कर्तव्य पूर्ण करावंस असा त्यांचा उपदेश इथे लक्षात घ्यायला हवा. रामायणात दिलीप राजाने नंदिनी गायीचा केलेला सांभाळ आणि पुढे त्याबद्दल मिळालेलं उत्तम फळ वाचकांनी वाचलं असेल. (याच वंशात पुढे रामचंद्रांसारखे पराक्रमी आणि सत्यवचनी राजे जन्मले.) सांप्रत अन्य सर्व प्राणीपक्ष्यांप्रती सहानुभूती दाखवणारी आणि वेळप्रसंगी त्यासाठी न्यायालयात जाणारी मंडळी अवैध गोहत्येबद्दल मात्र सोयीचं मौन बाळगतात किंवा विरोधी मत मांडतात. एखाद्या प्राण्याची उपयुक्तता संपल्यानंतर तो फुकट का पाळावा, का पोसावा असा प्रश्न विचारणाऱ्यांनी स्वत: वृध्द झाल्यावर मुलांनी आपल्याशी असं वागलं तर चालेल का हादेखील विचार करावा. काहीही उपयोग नसल्यामुळे मरणासन्न अवस्थेतील वृद्धांचे अवयव विकण्याचा विचार कोणी केला तर काय होईल याचाही विचार करावा. आज अनेक शेतकरी बांधव आहेत जे पोटच्या पोरांप्रमाणे गायीगुरांना जीव लावतात, त्यांच्याशी बोलतात, खेळतात. त्यांना मनातील सुखदु:ख सांगतात. सणावाराला गोडधोड नैवेद्य करुन पहिला घास त्यांना भरवतात. विशेष दिवशी त्यांना सजवतात, लेकराप्रमाणे जपतात. असं असताना हे लोक कत्तलखान्यात गुरांची रवानगी करण्यासारखी गोष्ट हेतुपुरस्सर करतील हे शक्य वाटत नाही. त्यांच्यावर नाईलाजानेही अशी वेळ येता नये यासाठी समाजाने हातभार लावणं आवश्यक आहे. ऋग्वेदात अशा वृध्द गो, बैलांकरता विशेष कुरणाची योजना राजाने करावी आणि त्यांची देखभाल योग्य पद्धतीने व्हावी असा संदेश दिला गेल्याचे संदर्भ आले आहेत. राजाचं हे कर्तव्य असल्याचं स्मृतिकारांनी सांगितलं आहे. म्हणूनच सर्वांनी उत्पन्नातला काही भाग गायी-गुरांसाठी दिला किंवा दुष्काळग्रस्त भागातल्या गुरांच्या छावणीतल्या चारा-पाण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला तर या शेतकरी आणि गोपालकांना अल्प हातभार लागेल यात शंका नाही.

## घ्या ज्योतिषशास्त्राची मदत

ऑफिसमध्ये किंवा कामाच्या ठिकाणी गेल्यावर कामात लक्ष लागत नसेल; उत्साह, ऊर्जेची कमतरता असेल किंवा निराशावादी विचार येत असतील तर कामाच्या ठिकाणी नकारात्मक ऊर्जेचा वास आहे असं समजावं. या नकारात्मक ऊर्जेमुळे ध्येय पूर्ण करण्यात



अनेक अडचणी जाणवू शकतात. अशा वेळी सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्यासाठी काही उपाय योजता येतील.

✻ कामाच्या ठिकाणची फरशी मीठाच्या पाण्याने पुसून घ्या. हा उपाय २७ दिवस करा. या कृतीचे सकारात्मक परिणाम जाणवू लागतील.

वास्तू

✻ उद्योग-व्यवसायाच्या वाढीबाबत चर्चा करायची असेल तर पूर्वेला तोंड करून बसा.

✻ तुम्ही व्यावसायिक असाल आणि कुंडलीत जलतत्त्व कमकुवत असेल तर कार्यालयात सेलिंग शीप किंवा डॉल्फिनचं चित्र लावायला हवं. चांगले परिणाम मिळवण्यासाठी वास्तूतज्ज्ञांचा सल्ला घेता येईल.

✻ तुमची जन्मतारीख प्रभावशाली नसेल तर कार्याचा आरंभ करताना मुलगा-मुलगी किंवा पत्नीची जन्मतारीख सुयोग्य ठरु शकते.

✻ आपल्या प्रगतीत दिशांना अनन्यसाधारण महत्त्व असतं. त्यामुळे दिशेबाबत योग्य तो सल्ला घ्या.


✻ व्यवसायात यश मिळवण्यासाठी उत्तर आणि उत्तर-पश्चिम या दिशांवर लक्ष केंद्रित करा.

✻ धनाची देवता असणाऱ्या कुबेराचा निवास उत्तर दिशेला असतो. त्यामुळे धनवृद्धीसाठी उत्तर आणि उत्तर-पूर्व दिशांकडे लक्ष केंद्रित करा. उत्तरेकडे कुबेराची मूर्ती किंवा फोटो ठेवता येईल.

✻व्यवसाय किंवा व्यापाराची सुरूवात करताना ज्योतिषशास्त्राची मदत घ्या.

## सकारात्मक विचारांचं बळ

आपल्या मनावर, शरीरावर आणि एकंदरितच आयुष्यावर विविध विचारांचा प्रभाव असतो. नकारात्मक विचारांमुळे ताणतणाव आणि अपयशाला निमंत्रण मिळतं. आपण स्वत:शी संवाद साधत असतो. या संवादांमध्ये नकारात्मकता भरलेली असते. स्वत:शी संवाद साधताना नेमकं काय करावं याविषयी...




✻ मी मूर्ख आहे, कायम चुका करतो, लोक मला मूर्ख समजतात असा विचार करण्याऐवजी माझा स्वत:वर आणि स्वत:च्या क्षमतांवर पूर्ण विश्वास आहे, चुकांमधून मी नव्या गोष्टी शिकणार आहे, मी धडा घेणार आहे असा विचार करा.

✻ या अस्वस्थतेचा मला कंटाळा आलाय अशा विचाराऐवजी मी काळजी करणार नाही, परिस्थितीचा नेटाने सामना करेन, एके दिवशी सगळं ठीक होईल, आयुष्य नक्की सुधारेल असा विचार करा.

✻ मला हे जमणार नाही किंवा आता मी प्रयत्न करणं सोडेन या विचाराऐवजी माझी कुठे चूक होतेय हे शोधून काढेन आणि त्यावर काम करेन असा विचार मनात आणा.

✻ हे अशक्य आहे किंवा कठिण आहे असा विचार करण्याऐवजी मला हे जमेल, थोडा वेळ लागला तरी हरकत नाही पण मी हे करून दाखवेन, असा विचार करा.

सेल्फ हेल्प

✻ यापेक्षा चांगलं करता येणार नाही या विचाराऐवजी हे माझं सर्वोत्कृष्ट काम आहे का? मी यापेक्षा चांगलं करू शकतो का? करू शकत असेल तर मी नक्की करेन, असा विचार करा.


✻ आपण एखाद्यासारखं होऊ शकत नाही असा विचार करण्याऐवजी मी त्यांच्यासारखं होण्याचा प्रयत्न करेन असा विचार करा.

✻ माझ्यासोबत असं का घडलं, असं म्हणत रडत बसण्यापेक्षा यातूनही काही चांगलं निष्पन्न होईल, यामुळे मी इतर शक्यता पडताळून पाहू शकतो, असा विचार करा.

✻ मला कधीच यश मिळणार नाही असा विचार करण्याऐवजी मला देवाचे आशीर्वाद मिळाले आहेत, असं म्हणा. आजवर मिळवलंय आणि आयुष्यात जे मिळवू शकता त्याचा विचार करा. आनंदी रहा. आता मला खूप शांत वाटतंय, असं सतत म्हणत रहा.

## अतर्क्य आणि अनपेक्षित

हे जग चित्रविचित्र घटनांनी भरलेलं आहे. आपल्या आसपास विविध घटना घडत असतात. काही गोष्टींवर, घटनांवर विश्वास ठेवणं कठीण जातं. अकल्पित, अतर्क्य असं काहीतरी घडत असतं. उदाहरण द्यायचं झालं तर सुकलेलं रोपटं काढून टाकावं असा विचार आपल्या मनात अगदी सहज येतो. पण आपण कंटाळा करतो. दुसऱ्या दिवशी त्या रोपट्याला नवी पानं आलेली असतात. इवली इवली पानं आपल्याला खुणावत असतात. ट्रेनमध्ये प्रचंड गर्दी असते. अगदी चढायलाही जागा नसते. बसण्यास जागा मिळण्याची सुतराम शक्यता नसते. अशा वेळी अचानक कोणीतरी उठतं आणि बसायला जागा मिळते. वाहत्या नद्यांचं वैराण जमिनीत रूपांतर होतं. आयुष्यात यशस्वी म्हणवणारे अनेक जण अखेरच्या क्षणी भुकेकंगाल होतात. एकंदर अनपेक्षित असं बरंच काही आपल्या आसपास घडत असतं.



कोणाचा घडा भरतोय. कोणाचं नशीब उजळतंय तर काहींना प्रयत्नांतीही यश मिळत नाही. कोणाकडील सगळी संपत्ती तो ओरबाडून घेतो. सगळं काही काढून घेतो तर कोणाला अनपेक्षित धनलाभ होतो. फारशी पात्रता नसणारी व्यक्तीही यशाच्या पायऱ्या चढते. संपन्न-समृद्ध होते तर पात्रता असणाऱ्या माणसाची झोळी रिकामीच राहते. अनेकांना अनपेक्षितपणे बरंच काही मिळतं तर अनेकांच्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. यालाच परमेश्वराची लीला म्हणतात. देवाला काहीही वर्ज्य नाही. देव कोणालाही उत्तर द्यायला बांधील नाही. त्याच्यावर कशाचीही जबाबदारी नाही.

बोध

माणसाच्या हातात काहीही नाही. परमेश्वरी कृपा प्राप्त करून घेण्यासाठी तो फक्त प्रार्थना करू शकतो. त्याची करूणा भाकू शकतो. देवाने दिलेल्या गोष्टींवर तो समाधानी राहू शकतो किंवा असमाधानी असू शकतो. उर्वरित सगळं देवाच्या हातात आहे. घडणं आणि बिघडवणं हे सगळं तोच करू शकतो. त्यामुळे देवाचं स्मरण करत राहा. त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवा.

## शनिदेवाचं अनोखं मंदिर

शिंगणापुरातल्या शनिदेवाच्या चौथऱ्यावर महिलांना प्रवेश देण्याच्या मुद्यावरून मध्यंतरी बराच वाद निर्माण झाला होता. पण इंदूरमधल्या एका शनिमंदिरात शनिदेवाला महिला तेल अर्पण करतात. इतकंच नाही तर शनीच्या पूजेची जबाबदारीही एका महिलेला देण्यात आली होती. इंदूरमधल्या जुनी इंदूर परिसरात शनिदेवाचं पुरातन मंदिर आहे. या मंदिराला ३५० वर्षांचा इतिहास आहे. या ठिकाणी महिला आणि पुरूष असा कोणताही भेदभाव केला जात नाही. पुरूषांप्रमाणेच महिलाही शनिदेवाला तेल अर्पण करतात. या मंदिराची जबाबदारी एका कुटुंबाकडे देण्यात आली आहे. हे कुटुंब गेल्या अनेक वर्षांपासून शनीच्या पूजनाची जबाबदारी सांभाळत आहे. मंदिरात पूजाअर्चेची जबाबदारी सांभाळणाऱ्या पुजारी आजोबांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या पत्नीने मंदिराची सगळी जबाबदारी स्वीकारली होती.




दर शनिवारी तसंच शनी जयंतीला इथे भाविकांच्या रांगा लागतात. महिला आणि पुरूषांची स्वतंत्र रांग असते. या मंदिराबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की, पूर्वी या मंदिराच्या ठिकाणी २० फूट उंचीचा मनोरा होता. सध्याच्या पुजाऱ्यांचे पूर्वज पंडित गोपालदास तिवारी इथे रहायला आले. ते अंध होते. एक दिवस त्यांच्या स्वप्नात शनिदेव आला. या स्वप्नानंतर त्यांची दृष्टी परत आली. शनीच्या आदेशानुसार इथे खोदकाम करण्यात आलं. इथल्या जमिनीत शनीची मूर्ती सापडली. तेव्हापासून या स्थानाला महत्त्व प्राप्त झालं. या मूर्तीची स्थापना करण्यात आली. या ठिकाणी बोललेला नवस पूर्ण होतो अशी भाविकांची श्रद्धा आहे.

तीर्थक्षेत्र

## का वाचावी गीता?

श्रीमद् भगवद गीता हा अत्यंत पवित्र असा धर्मग्रंथ. गीतेत भगवान श्रीकृष्णाने जीवनाचं तत्त्वज्ञान विषद केलं आहे. कुरूक्षेत्रावर आपल्याच भावंडांविरोधात लढणाऱ्या अर्जुनाला श्रीकृष्णाने गीतेतून ज्ञानामृत पाजलं. आजही गीतेतलं तत्त्वज्ञान तितकंच महत्त्वाचं मानलं जातं. प्रत्येक वयोगटातली, कोणत्याही मानसिक अवस्थेतून जाणारी किंवा कोणत्याही स्वभावाची व्यक्ती गीतेतून बरंच काही शिकू शकते. वय आणि परिस्थितीनुसार प्रत्येक व्यक्ती गीतेतून बोध घेऊ शकते. गीतेतून कोणी कोणता बोध घ्यावा याविषयी...




उपदेश

✻ जीवनाचं उद्दिष्ट जाणून घेऊन जगण्याचा योग्य मार्ग शिकण्यासाठी युवकांनी गीता वाचली पाहिजे.

✻ आयुष्यातली सगळी कर्तव्य पार पाडून निवृत्तीचं आयुष्य जगणाऱ्या ज्येष्ठांनी मोक्षप्राप्तीसाठी गीता वाचायला हवी.

✻ जीवनातल्या खाचाखोचा समजून घेण्यासाठी भाबड्या माणसाने गीता वाचली पाहिजे.

✻ रागीट माणसाने गीतेतून मानवतेचे धडे घ्यायला हवे.

✻ दया आणि सहानुभूतीची भावना अंगी रूजवण्यासाठी श्रीमंत माणसाने गीता वाचली पाहिजे.

✻ कमकुवत माणसाने शक्ती आणि धाडस अंगी बाणवण्यासाठी गीतेचं पारायण केलं पाहिजे.

✻ आपल्या बलाचा सुयोग्य वापर कसा करायचा याचे धडे बलशाली व्यक्ती गीतेतून घेऊ शकते.

✻ अशांत, अस्वस्थ मनाला शांत करण्यासाठी गीता वाचली पाहिजे.

✻ रस्ता भटकलेल्या माणसाला योग्य मार्गावर आणण्याचं काम गीता करते. त्यामुळे चुकीच्या मार्गावर चालणाऱ्यांनी गीता वाचली पाहिजे.

✻ पापी माणसाने प्रायश्चित्त करण्यासाठी गीता वाचली पाहिजे.



# चंद्रपूरचे जिल्हाधिकारी ठरले राज्यात सर्वोत्कृष्ट

## शंभर दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम



■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ३ : राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. हे राज्यातून सर्वोत्कृष्ट ठरले आहेत. जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या नेतृत्वात ८४.२९ गुण मिळवत चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्यातील शासकीय कार्यालयांना शिस्त लावणे, नागरिकांची कामे जलदगतीने पूर्ण होणे आणि शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होणे या उद्देशाने १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम हाती घेण्यात आली होती.

या मोहिमेच्या पहिल्या टप्प्याचे मूल्यमापन महाराष्ट्र दिनी जाहीर करण्यात आले. यात उत्कृष्ट जिल्हाधिकारी कार्यालय श्रेणीत चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाने बाजी मारली. तर द्वितीय क्रमांक जिल्हधिकारी कार्यालय, कोल्हापूर (गुण ८१.१४), तृतीय जिल्हाधिकारी जळगाव (८०.८६), चतुर्थ जिल्हाधिकारी अकोला (७८.८६) आणि पाचवा क्रमांक जिल्हाधिकारी नांदेड (६६.८६ गुण) यांनी पटकावला.

याबाबत बोलतांना जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाला राज्यात प्रथम क्रमांक मिळाला, ही आपल्या सर्वांसाठी अतिशय अभिमानाची बाब आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे यात मोठे योगदान आहे. लोकांना अधिकाधिक चांगल्या सेवा कशा देता येईल, शासन त्यांच्यापर्यंत कसे पोहचले, याबाबत योग्य नियोजन करण्यात आले. तसेच शासनाच्या सुचनेप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील संकेतस्थळाचे अद्ययावतीकरण, तक्रार निवारण, अभ्यागतांसाठी सोयीसुविधा, ई-ऑफिस प्रणालीचा वापर, कृत्रीम बुद्धिमत्तेचा वापर करून अधिकार व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, गुंतवणुकीस प्रोत्साह आणि नाविन्यपूर्ण उपक्रमाचा यात समावेश होता, असे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सांगितले.

### मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व विजेत्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, गुणवत्ता मोहिम एक सुरवात आहे. नागरिकांना जीवन सुखकर करण्यासाठी ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेचे चळवळीत रुपांतर होऊन नागरिकांना उत्तम सेवा देण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

भारतीय गुणवत्ता परिषद मार्फत संकेतस्थळ अद्यावतीकरण व कार्यक्षमता, कार्यालयीन सोयीसुविधा, तक्रार निवारण व्यवस्था, गुंतवणूक अनुकूलता, नागरिकांसाठी सेवा सुलभता, तंत्रज्ञान वापर अशा दहा निकषांवर आधारित मूल्यमापन करण्यात आले आहे.रर

# ३६ वर्षीय नराधमाकडून २ अल्पवयीन मुलींवर अत्याचार



■ महासागर प्रतिनिधी भंडारा, दि. ३ : महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसून येत आहे. भंडारा जिल्ह्यातही अशीच धक्कादायक घटना समोर आली आहे. एका ३६ वर्षीय व्यक्तीने शेजारी राहणाऱ्या ८ आणि ९ वर्षाच्या अल्पवयीन मुलींवर अत्याचार केला आहे.

मोहाडी तालुक्याच्या करडी गावात हा प्रकार घडला . अतुल नामक इसमाने शेजारी राहणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार केला. या अत्याचाराबद्दल कुणाला सांगितले तर जीवे ठार मारेल अशी धमकीही त्याने मुलींना दिली होती. मुलींना चॉकलेट देतो म्हणत त्यांच्यावर अत्याचार केला.

घरी गेल्यावर त्रास होत असल्याने अल्पवयीन मुलीने आपल्या आईला घडलेला सर्व प्रकार सांगितला. यानंतर पीडितेच्या पालकांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, तपास सुरू आहे.

# मारहाण करत तरुणीवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३ : यवतमाळच्या वणीमध्ये अनोळखी आरोपीने एका अठरा वर्षीय मुलीवर अतिप्रसंग व अनैसर्गिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना १ मे महाराष्ट्र दिनी दुपारी गांधी नगर परिसरातील गॅस गोडावून मागे तळ्याजवळ घडली.

या प्रकरणात पिडीतेच्या तक्रारीवरुन अनोळखी नराधमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेने सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

प्राप्त माहिती नुसार गांधीनगर परिसरात असलेल्या वीट भट्ट्यातील विटांचे तुकडे जमा करण्याकरिता ही मुलगी घरून जात असताना निर्जनस्थळी एका अनोळखी आरोपीने तिला पकडले. तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत बाजूला असलेल्या तळ्याजवळ खेचत नेले. तसेच तिचे कपडे फाडून तिला काटेरी झुडपात नेत तिच्यावर बळजबरी केली. या नराधमाने तिच्यावर अतिप्रसंग करतानाच अनैसर्गिक कृत्य देखील केले.

या घटनेने पीडीत मुलगी प्रचंड हादरली. तिने घरी येऊन आपल्या आईला आपबिती सांगितली. तीच्या आईने लगेच मुलीच्या वडिलांना फोन करून माहिती दिली. हे ऐकून वडील तत्काळ घरी आले, मुलीला सोबत घेऊन आई वडिलांनी सरळ पोलिस स्टेशन गाठले. पीडीत मुलीने रीतसर तक्रार नोंदवली.

## शहानूर जंगल व नरनाळा किल्ला सफारी बंद

# जिप्सी चालकांचे चक्काजाम

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३ : मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत येणारी शहानूर येथील जंगल व नरनाळा किल्ला सफारी १ मेपासून बंद झाली आहे. नरनाळा वन पर्यटन संघटनेच्या जिप्सी चालकांनी भाडेवाढ करण्याच्या मागणीसाठी बंद पुकारला. त्यामुळे गेल्या तीन दिवसांपासून सफारी बंद असून पर्यटकांचा हिरमोड झाला आहे. स्थानिकांचा रोजगार देखील बुडाला आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत अकोट वन्यजीव विभागामध्ये नरनाळा किल्ला व शहानूर येथील जंगलाचा समावेश आहे. नरनाळा किल्ल्याच्या पायथ्याशी शहानूर येथे वन पर्यटन केंद्र असून त्या ठिकाणावरून नरनाळा किल्ला व शहानूर जंगलासाठी सफारी केली जाते.

यासाठी ऑनलाइन नोंदणी करण्यात येते. मात्र, गेल्या तीन दिवसांपासून ही सफारी बंद आहे. विविध मागण्यांसाठी नरनाळा वन पर्यटन संघटनेने संप पुकारला.

पेट्रोलचे वाढलेले दर लक्षात घेता व पर्यटन मार्गात नव्याने वाढ झाल्यामुळे शहानूर सफारीचे केवळ जिप्सी प्रवास भाडे अडीच हजारावरून चार हजार व नरनाळा किल्ला सफारीचे दीड हजारावरून अडीच हजार करण्याची मागणी संघटनेने केली.

करोना काळामुळे बंद केलेली रात्रीची सफारी व पूर्ण दिवसाची सफारी सुरू करण्यात यावी, नरनाळा परिक्षेत्रातील बफर क्षेत्रात मचाण सुरू करावे, शहानूर सफारी द्वारावरील गाईड व जिप्सी चालक यांना गणवेश व ओळखपत्र द्यावे, शहानूर सफारी मार्गावरील खासगी सर्व वाहने बंद करण्यात यावी, शहानूर सफारी द्वार ते नरनाळा किल्ला दरम्यान रस्त्याचे डांबरीकरण होत असल्यामुळे पावसाळ्यात नरनाळा किल्ला सफारी सुरु ठेवावी, जिप्सी गाईड व जिप्सी चालक यांना प्रशिक्षण देण्यात यावे आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले होते.

### २६ जिप्सींचा चक्काजाम

शहानुर येथील द्वारावरून जंगल सफारी व किल्ला सफारीसाठी २६ जिप्सी उपलब्ध आहेत. पेट्रोलचे भाव वाढण्यासोबतच गाडीची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे खर्चिक झाले. त्यामुळे भाडेवाढ करण्यासह विविध मागण्यांसाठी १ मेपासून बंद पुकारला. प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा झाली, मात्र कुठलाही तोडगा निघू शकला नाही.

## सोन्याच्या दरात ११ दिवसांत ५,६०० रुपयांची घट



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ : करोनानंतर सोन्याच्या दरात मोठ्या प्रमाणात सतत वाढ झाली. २२ एप्रिल २०२५ रोजी सोन्याच्या दराने जीएसटी व मेकिंग शुल्क पकडून एक लाखाचा पट्टा ओलांडला. परंतु त्यानंतर सोन्याच्या दरात सातत्याने घट होत आहे.

नागपुरातील सराफा बाजारात शनिवार ३ मे रोजी प्रति १० ग्राम २४ कॅरेटसाठी ९३ हजार ८०० रुपये, २२ कॅरेटसाठी ८७ हजार २०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७३ हजार २०० रुपये, १४ कॅरेटसाठी ६१ हजार रुपये नोंदवले गेले. त्यामुळे ग्राहकांमध्ये आनंद असल्याचे दिसते.

# खोटी माहिती देऊन जन्म प्रमाणपत्र घेणाऱ्यांची खैर नाही.. सोमय्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ : भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या हे विरोधकांचे प्रकरण खोदून काढून ते ईडीकडे सोपवण्यासाठी ओळखले जातात. आता ते एका नवीन प्रकरणासाठी महाराष्ट्रभर फिरत आहेत. राज्यात जन्मप्रमाणपत्र घोटाळा झाला असून खोटी माहिती देऊन प्रमाणपत्र घेणारे काही नागपुरातही आहेत. त्यामुळे ज्यांनी शासनाची फसवणूक करून असे प्रमाणपत्र घेतले असतील त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी स्पष्ट केले.

खोटी माहिती देऊन जन्मप्रमाणपत्र घेणाऱ्यांच्या विरोधात किरीट सोमय्या राज्यभरात फिरून मोहीम राबवत आहेत. पंधरा दिवसांपूर्वी ते याच संदर्भात नागपुरात आले होते. यावेळी महापालिका व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांशी त्यांनी चर्चा केली होती. सोमय्या यांनी पुन्हा एकदा महापालिकेत भेट देत या मुद्यावर माहिती घेतली.



बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सोमय्या म्हणाले, खोट्या माहितीच्या आधारे जन्मप्रमाणपत्र घेणाऱ्यांचे प्रमाण नागपुरातही आढळून आले आहे. यासंदर्भात प्रशासनाला निर्देश दिल्यानंतर नागपूर महापालिका व जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी याची माहिती घेत अशा काही कागदपत्रांची तपासणी केली.

यामध्ये दोनशे ते सव्वा दोनशे प्रमाणपत्रांमध्ये चुकी झाल्याचे आढळून आले आहे. याची अधिक सखोलपणे चाचपणी करण्यात येणार आहे. त्यामुळे पुढील आठ दिवसात या प्रकरणातील आणखी धागेदोरे समोर येण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी नायब तहसीलदारांकडून देण्यात आलेल्या प्रमाणपत्राबद्दल विचारले असता सोमय्या म्हणाले, हा घोटाळा पुढे आल्यानंतर नायब तहसीलदारांना दिलेले प्रमाणपत्र रद्द ठरवण्यात आले आहे. दरम्यान असे असले तरी तरी दिलेले प्रमाणपत्र परत घेण्याचे काम अजूनही सुरु झालेले नाही. त्यामुळे खोट्या माहितीच्या आधारे प्रमाणपत्र मिळवणारी व्यक्ती गैरवापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याचे गांभीर्य बघता या व्यक्तींकडून ते प्रमाणपत्र लवकरात लवकर काढण्याचे निर्देशही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. बोगस जन्मप्रमाणपत्राच्या संदर्भात महापालिका व जिल्हाधिकारी कार्यालय संयुक्तपणे चाचपणी करत असून येणाऱ्या काळात यात आणखी काही बाहेर येण्याची शक्यता आहे. तसेच यातील दोषींवर लवकरच गुन्हा दाखल होणार असल्याचेही सोमय्या म्हणाले.

दुसरीकडे, जन्म प्रमाणपत्र तपासण्यासंबंधीची अनावश्यक कामे मागे लागल्याने काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नाराजी बोलून दाखविली.

## : साप्ताहिक संवाद :

# कृत्रिम प्रज्ञेसाठी मराठीचा ज्ञानकोश

**लोकरंग**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर आता भविष्याच्या दृष्टीने भाषेबाबत आवश्यक आहे. हीच गरज ओळखून मुंबईतील माटुंग्याच्या वीरमाता जिजाबाई इन्स्टिट्यूटमधील इन्क्युबेशन सेंटर मध्ये दोन विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमतेसाठी मराठीतील सर्वात मोठे लार्ज लँग्वेज मॉडेल तयार केले आहे. हे मॉडेल नेमके काय आहे? या संधर्भात ओम पाटील यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**कृत्रिम प्रज्ञेसाठी मराठीचा ज्ञानकोश म्हणून तयार केलेले लार्ज लँग्वेज मॉडेल काय आहे?**

○ हे लार्ज लँग्वेज मॉडेल विकसित करताना आम्ही मराठी भाषेत प्रकशित झालेल्या १०० जीबी पर्यंतच्या आकाराच्या डेटाचा वापर केला आहे. यात अनेक साहित्यिकांच्या साहित्यापासून विश्वकोश, राज्य लोकसेवा परीक्षेचे साहित्य, विविध मराठी संकेतस्थळ आदी मराठीतील साहित्य आणि ज्ञान लेखनाचा समावेश आहे. कृत्रिम बुध्दीमत्तेत म्हणजेच ए आय तंत्रज्ञानात मराठी भाषेचा समावेष करण्यासाठी त्या भाषेतील माहिती असणे आवश्यक असते.

चाट जीपीटी या ओपन ए आय सोअर्सकडे जगभरातील माहितीचा तपशील असला तरी, या प्रणालीला एखादा प्रश्न मराठीत विचारला तर प्रणाली विविध भाषांमधील उपलब्ध माहिती वापरून त्याचे उत्तर देते. त्यामुळेच आम्ही सेरेब्रलझिम टेक्नॉलॉजीस हि स्टार्ट अप कंपनी सुरु करून हे लार्जर लँग्वेज मॉडेल तयार केले आहे.

**मराठी भाषेत हे मॉडेल तयार करताना कोणती आव्हाने समोर होती?**

○ सर्वात महत्वाचं म्हणजे एआय तंत्रज्ञानात मराठी भाषेत साहित्य उपलब्ध नव्हतं. मराठी भाषेची हि त्रुटी दूर करण्यासाठी आम्ही हे मॉडेल तयार केले. हे मॉडेल तयार करण्यासाठी इन्क्युबेशन सेंटर ने प्रचंड मोठ्या क्षमतेचा सर्वर उपलब्ध करून दिला आहे.

फक्त मराठी लार्ज लँग्वेज वर आधारित असलेल्या प्रणालीत देखील फक्त १३ जीबी डेटावर काम केले आहे. मराठी भाषेत योग्य परिणाम साध्य होण्यासाठी मग आम्ही मराठीतील दर्जेदार साहित्याकडे मोर्चा वळवला. यात वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, कुसुमाग्रज, दया पवार, अण्णाभाऊ साठे अशा मराठी साहित्यिकांचे साहित्य या प्रणालीवर घेतले आहे.

**या मॉडेलचा वापर कसा होणार आहे?**

○ हा डेटा फक्त लोड करून चालत नाही तर व्याकरणातील विशेष कसोट्या वापरून त्याला प्रशिक्षित करावे लागते. सध्या या मॉडेलचा वापर काही सरकारी विभागात वापरण्याच्या दृष्टीने चाचणी सुरु आहे. अभिजात मराठी भाषेची सांगड अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी घालण्य्साठी हा प्रकल्प महत्वाचा ठरणार आहे.

■ ■ ■

## मुंबईत तिसरे प्रगत कर्करोग उपचार केंद्र सुरू


सनएकट अडवांस कॅन्सर थेरेपी, ही देशात सर्वात प्रगत आणि नाविन्यपूर्ण कर्करोग उपचार परवडणाऱ्या किमतीत सहज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने डॉ. विजय पाटील आणि डॉ. अशय कारपे यांनी स्थापन केलेली ऑन्कोलॉजी स्टार्ट-अप कंपनीने भारतातील आपले तिसरे आणि मुंबईतील पहिले सेंटर खार येथील डॉ. गुप्ते सर्जिकल हॉस्पिटलमध्ये सुरू केले आहे.

या नव्या सेंटरमध्ये भारतात प्रथमच घनगंभीर ट्युमरसाठी CAR-T उपचार तसेच सनएकट द्वारे भारतात प्रथमच सादर होणारे विविध उपचार उपलब्ध असणार आहेत. डॉ. सुधीर गुप्ते यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. डॉ. विजय पाटील, डॉ. अशय कारपे , कुशाग्र शर्मा, डॉ. कुमार प्रभाष उपस्थित होते. सनएकटचे संस्थापक आणि कर्करोग तज्ज्ञ डॉ. विजय पाटील म्हणाले, या उद्घाटनामागे केवळ वाढ नव्हे, तर कर्करोग उपचारात समानता आणि प्रवेशयोग्यता निर्माण करण्याची चळवळ आहे. आमचा उद्देश आहे की भौगोलिक स्थानावरून उपचाराच्या दर्जाचे ठरवले जाणे थांबावे. खारमधील हे केंद्र म्हणजे आमच्या स्वप्नाला प्रत्यक्षात आणण्याचा एक महत्त्वाचा टप्पा असून, स्थानिक परिसरात अत्याधुनिक उपचार उपलब्ध करून देणे हेतू आहे.




## धार्मिक पर्यटन स्थळांचा वारसा जपणारे कोल्हापूर

कोल्हापूर पर्यटकांसाठी एक अविस्मरणीय स्थळ आहे. कोल्हापुरात विराजमान, महालक्ष्मी अंबाबाई मंदिर हे प्रसिद्ध आणि पूजनीय देवस्थानांपैकी एक आहे. ज्योतिबाला केदारेश्वर-केदारलिंग असेही म्हणतात. डोंगरमाथ्यावर पोहोचल्यावर कोल्हापूर शहराचे विहंगाम दृश्य पाहायला मिळते. मंदिराची वास्तुकला देखील भव्य आहे. कोल्हापूरच्या वायव्येला, शांततेच्या कुशीत विसावलेला, ज्योतिबा डोंगर आपल्या भव्यतेने सर्वांना मोहित करतो.




हजार फूट उंचीवर उंचावलेला हा डोंगर, सपाट प्रदेशातून उंच उंच उंचावल्याने एका भव्य शंखाकृतीला साकारून उभा आहे. वाडी रत्नागिरी नावाने ओळखला जाणारा हा डोंगर, सह्याद्रीच्या रांगेचाच एक भाग आहे आणि पन्हाळा आणि कृष्णा नदी यांच्यामध्ये दुर्मिळ सौंदर्याने नटलेला आहे. डोंगराच्या पठारावर, ज्योतिबा मंदिर आणि गाव वसलेले आहे.

देवळाकडे जाताना, प्रथम आपल्या स्वागतासाठी येते भव्य दगडी प्रवेशद्वार, मराठा शैलीतील कलाकुसरीने सजलेले. या प्रवेशद्वारातून प्रवेश करताच, पायऱ्या उतरता उतरता दिसू लागतात तीन देवळांचा भव्य समूह. या तिघांमध्ये मध्यभागी, केदारलिंगाचे मुख्य देवालय आपल्या भव्यतेने सर्वांना आकर्षित करते. ज्योतिबा भक्त किवळ गावचे नावजी साळुंखे पाटलांनी (संत नावजीनाथ) बांधलेले असल्याचे सांगितले जाते. १७३० मध्ये राणोजीराव शिंदे यांनी या मूळ देवळाच्या जागी नवीन भव्य देवालय बांधले. ५७ फूट लांब, ३७ फूट रुंद आणि ७७ फूट उंच शिखरासह हे देवालय आजही ज्योतिबाची भक्ती आणि कलाकुसरीचे प्रतीक आहे.

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## डंपरने धडक दिल्याने महिलेचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३ : वाघोली परिसात एका डंपर चालकाने भरधाव वेगात दुचाकीला धडक दिल्याने महिलेचा जागीच मृत्यु झाला तर पती किरकोळ जखमी झाल्याचा प्रकार घडला आहे.

रुपाली सुरज तिवारी (वय २७, रा. पार्थ व्हीलाज, बायफ रोड,पुणे) असे मयत महिलेचे नाव आहे. तर तिचे पती सुरज तिवारी हे जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले आहे.

याप्रकरणी डंपरचालक शुभम सुदाम मस्के (वय २५, रा. लोणीकंद, पुणे) व डंपर मालक प्रमोद संभाजी भाडळे (रा. वाघोली, पुणे) यांचेवर वाघोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. अपघातानंतर घटनास्थळी नागरिकांनी रोष व्यक्त केला.



■ *नागपूर : देशभरात उन्हाची दाहकतावाढू लागली असून, सकाळी ९ वाजतानंतर घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. दुपारच्या सुमारास रस्ते निर्मनुष्य दिसू लागले आहेत. अशाही स्थितीत पोटाची खळगी भरण्यासाठी कामगार महिला पुरूषांना रखरखत्या उन्हात काम करावेच लागते. अशाच एका कामावर असलेली ही महिला शितपेयाच्या जुनाट बाटलीत भरून आणलेल्या पाण्याने आपली तृष्णा भागवत आहे.*

# तनिषाच्या जुळ्या मुलींसाठी सरकारचा पुढाकार

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून २४ लाखांची मदत



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने तनिषा भिसे यांच्या जुळ्या मुलींसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून २४ लाख रुपयांची मदत मंजूर केली आहे. सरकारने हे पैसे संबंधित रुग्णालयाच्या खात्यात वर्ग केले असून, त्यातून या मुलींवर उपचार केले जात आहेत.

तनिषा भिसे नामक एका गरोदर महिलेला काही दिवसांपूर्वी दीनानाथ रुग्णालयात गंभीर स्थितीत प्रसूतीसाठी आणण्यात आले होते. पण रुग्णालय प्रशासनाने त्यांना १० लाखांचे डिपॉझिट भरल्यानंतरच दाखल करून घेण्याची भूमिका घेतली होती. परिणामी उपचारास विलंब झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी सत्ताधारी महायुतीसह विरोधी बाकावरील महाविकास आघाडीच्या सर्वच घटकपक्षांनी दीनानाथ रुग्णालयाबाहेर निदर्शने केली होती. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून तनिषा यांच्या जुळ्या मुलींवरील उपचारासाठी २४ लाखांची रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, तनिषा भिसे यांच्या कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या भेटीत मुख्यमंत्र्यांनी बाळांच्या उपचारासाठी सर्वोतपरी मदत करण्याची ग्वाही दिली होती.

त्यानुसार, एका बाळाच्या उपचारासाठी १० लाख, तर दुसऱ्या बाळाच्या उपचारासाठी १४ लाखांची रक्कम मंजूर करण्यात आली आहे. ही मदत रुग्णालयाने दिलेल्या अंदाजपत्रकानुसार देण्यात आली आहे. पुढील उपचारांसाठी आणखी गरज भासली तर त्याचा खर्चही मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून केली जाणार आहे. असे या कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले. जुळ्या मुलींचे वजन फार कमी आहे. त्यामुळे त्यांच्यावर पुण्यातील सूर्या हॉस्पिटलमधील अतिदक्षता विभागात उपचार केले जात आहेत.

# गुणांकनाच्या नावाखाली धुळफेक



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ : सरकारचं १०० दिवसांचं मूल्यांकन हे फसव्या चमकदार आकड्यांचं जाळं असून, खऱ्या समस्यांवरून जनतेचं लक्ष हटवण्याचा हा डाव आहे, अशा शब्दांत अंबादास दानवे यांनी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. विभागीय कामगिरीवर आधारित गुणांकनाचे निकाल प्रसिद्ध करून सरकारने स्वतःचा जयघोष केला असला, तरी ते केवळ पब्लिसिटी स्टंट असल्याचा घणाघात त्यांनी केला.

जनतेच्या ऐवजी सरकारी अधिकाऱ्यांनीच गुण देऊन आपल्याच पाठीवर शाबासकी दिली आहे, असा उपरोधिक टोला लगावत दानवे म्हणाले, एप्रिलमध्ये कमी गुण मिळालेल्या विभागांनी एका महिन्यात चमत्कारिक वाढ कशी केली? याचे सरकारने उत्तर द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

ठाकरे सरकार फोडण्यात भूमिका निभावणारे बाळासाहेब पाटील यांना पोलीस अधीक्षक विभागात पहिला क्रमांक देण्यात आल्याने ही यादी राजकीय हेतूने तयार करण्यात आली आहे, गुटखा-ड्रग्स महाराष्ट्रात येतोय, २१०० महिला अत्याचाराचे प्रकरणं आहेत, तरी गृहमंत्री आणि पोलीस यंत्रणेला सन्मान? असे ते म्हणाले. ८ लाख महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळलं, पिंक रिक्षा उपक्रम अयशस्वी ठरला, तरी महिला व बालविकास विभाग क्रमांक एक वर? असा रोष त्यांनी व्यक्त केला.